म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय
दा. क्र. ९३०७


BVBK-0401307

বাং বা
৭৩০৬

BVBK-0401307

१३०८

# सुग्रण



सुग्रण पक्षी खरोखरच सुग्रण असतो. घर बांधण्याचे नराचे कौशल्य थक्क करणारे असते; तर एकदा ते घर आपले मानले की मादी सारा जीव तिथेच कसा लावते याचे नवल वाटते !

दोघांच्या नीटनेटक्या आणि टापटिपीच्या गृहप्रेमामुळेच त्यांना सुग्रण ही सुगृहिणीची पदवी मिळालेली असावी. कारण या पक्ष्याची तशी आणखीही काही नावं आहेत – कुणी म्हणतं साळी, तर कुणी म्हणतं कोष्टी. इंग्रजीत यालाच 'बाया' म्हणतात. कोष्टी, साळी ही नावंदेखील या पक्ष्याच्या अंगच्या घरटं बांधण्याच्या विशिष्ट कसबीपणामुळंच मिळालेली असावीत.

'सुग्रण बांधी उलटा वाडा'

अशी त्याच्या कसबाची ख्याती ! झाडाझुडुपांच्या फांदीवर, विहिरींच्या आडोशाला कधीकधी दुधी भोपळ्याच्या आकाराची किंवा लहानग्या हत्तीच्या चिमुकल्या सोंडेसारखी एक उलटी गवती बाटली टांगलेली दिसते. ही गवती बाटली

म्हणजेच सुग्रणीचा उलटा वाडा. हे असले वाडे सुग्रणीनं सोडल्यावर, कुणी कुणी आपल्या घरात आणून झुंबरासारखे तुळईला टांगून ठेवतात. लहानपणी असाच एक वाडा माझ्या हाती लागला होता. कसा कुणास ठाऊक, नीटसे आठवत नाही. पण मी त्या वाड्यात काचेच्या खेळायच्या गोट्या, लोलक, पेन्सिलीचे तुकडे असा माझा खजिना ठेवून दिलेला होता. आणि काय आश्चर्य ! वाडा उलटा केला तरी आतल्या वस्तू खाली पडत नसत. मला तर आधी ही त्या वाड्यातली जादूच वाटली. पण नीट पाहिल्यावर कळून आले, की ही नुसतीच सरळ गवती बाटली नाही, तर मधल्या फुगीर भागात एक घट्ट विणीची सुबक खोलीदेखील आहे ! सुग्रणकाकू आपली अंडी याच खोलीत घालतात. आणि निवांतपणानं उबवीत बसतात. त्या संसार मांडतात तोच आधी घर पाहून !

म्हणजे काय होतं, की कोष्टीकाका बारीक बारीक गवताचे धागे जुळवून कापड विणल्यागत झकास घरटं विणतात. मग त्याना वाटतं की, एवढ्या सुरेख घरात एकट्यानंच कसं बरं राहायचं ? कोष्टीकाका लग्न करायचं ठरवतात. घराच्या गच्चीवर बसून 'वधू पाहिजे, वधू पाहिजे' अशी ओरडून दणक्यानं जाहिरात करतात. ती ऐकून साळीणकाकू येतात. सगळं घर हिंडून फिरून नीट बघतात, आणि मग पसंत पडल्यावर कोष्टीकाकांशी लग्न लावून घरात संसार थाटतात. घराची उरलीसुरली डागडुजीही करतात. झाडांवरचे काजवे धरून आणतात आणि चिखलाने लिंपून ठेवतात. सुग्रणकाकूंचा वाडा विजेच्या दिव्यागत आतून लखलखीत बनतो. काय पण युक्ती ! सुग्रणकाकूना मग आपलं घर, आपली पोरं-बाळं, त्यांचं पालनपोषण

याशिवाय दुसरं काही सुचत नाही. खरोखरच एखाद्या दक्ष गृहिणी-प्रमाणे त्या संसारात रमून जातात. दंग होतात.

पण कोप्टीकाका त्यातले नसतात. ते दुसऱ्या झाडाच्या फांदीवर दुसरं तसच घरटं विणतात आणि दुसऱ्या साळीणबाईंशी लग्न लावून टाकतात. वरं, या तरी घरात फार दिवस राहतात काय ? छे :, नाव नको! साळीणबाईनी अंडी घालायचाच अवकाश की कोष्टीकाका पडलेच बाहेर तिसरं घरटं विणायला. तिथं पुन्हा तिसरा संसार. असं एकेका ऋतूत अनेक घरं आणि अनेक लग्नं लावून कोप्टीकाका मोकळे होतात !

वरं, या सगळ्या बायकांना एका घरात ठेवावं म्हटलं तर भांडणाचा कहर होतो. कारण सवती-सवतींचं एकमेकींशी घटका-भर पटेल तर शपथ !

कोष्टीकाका विचार करतात, 'नकोच हा ताप रिकामा. त्यापेक्षा एकेकीला स्वतंत्र महालच विणून दिलेला बरा.'

असे हे कोष्टीकाका असतात लहानशा मुठीएवढे-चिमणा-चिमणीच्या आकाराचे तांबूस झाक असलेली इवलीशी पिसे दिसतात मात्र सुरेख. डोकं आणि छाती सोनेरी पिवळसर रंगाची असतात. जाड चोचीखाली काळा रंग उठून दिसतो. मादी अंडी घालण्याच्या काळात कोष्टीकाका आपला रंग बदलून ताबुता-तल्या वाघासारखे पिवळेजर्द बनतात म्हणे !

चैनी स्वभावाचा हा रंगीत पक्षी खुषीत असला म्हणजे जेवढा सोज्वळ दिसतो, तेवढाच आपल्या शत्रूचा समाचार घ्यायला सरसावला म्हणजे क्रुद्ध बनतो. प्रेमाची आणि संतापाची अशा दोन्ही भावना तो आपल्या पांढुरक्या भिवयांच्या चिटुकल्या डोळ्यांवाटेच व्यक्त करीत असतो. गमतीगमतीचे अंगविक्षेप करतो आणि मजशीर आवाजही तो काढतो.

# आभाळ मित्र

स्वभाव चैनी असला तरी क़ोष्टीकाका मोठे कामसू आणि मेहनती असतात. घरट्याचा ताणाबाणा विणताना त्यांना काही कमी श्रम पडत नाहीत. इतके सुंदर घरटे वांधणारा एका शिंपीण पक्ष्याखेरीज दुसरा पक्षी नाही. शिंपीण मात्र आपले घरटे झाडाची पाने चक्क एकमेकांना शिवूनच तयार करते. कापसाचे, लोकरीचे सूत, केळीचा तंतू किंवा कोळ्याच्या जाळ्याचा धागा ती मिळवते. मग आपल्या चोचीचा सुईसारखा उपयोग करून आधी दोन पानांना हवी तशी भोके पाडून घेते आणि नंतर त्यातून हा धागा ओवून घट्ट टीप घातल्यागत शिवून घेते. घरटेदेखील वघण्यासारखे सुरेख असते. इंग्रजीत ह्या पक्ष्याला ' टेलर'च म्हणतात.

पक्ष्यांचे हे सुग्रणपण पाहून नवल वाटते !

क्र. 9300 दि. ५/९/८२
त्रिप्र

# टिटवी

' इवलीशी टिटवी पण समुद्र कसा आटवी ' असा एक प्रश्न टिटवीची गोष्ट ऐकून मला नेहमी पडे. झालं होतं काय की टिटविणीची पिलं एकदा खट्याळ समुद्रानं आपल्या लाटेच्या धडाक्यानं वाहून नेली होती. टिटवीण गेली होती चारा-पाणी शोधायला. ती परतली नि पाहते तर वाळूतलं घर नाही की घरातली चिटुकली पिलंही नाहीत ! लाटांनी घातलेला धिंगाणा मात्र ओल्याकंच रेतीवरून आणि पांढऱ्याशुभ्र फेसावरून दिसून येत होता. टिटविणीनं समुद्राचा दुष्ट कावा ओळखला आणि लागली ती कंबर कसून मिटुकल्या चोचीनं समुद्र उपसायला !

' ट्टि ट्टि ट्टिट्‌–ट्टि ट्टि ट्टिट्‌ ' टिटवीचा फेरा कधीमधी अंगणात, परसात, दूरवर आळीत होतो नि तो विशिष्ट लकवदार पण कर्णकटू आवाज कानी येतो. क्वचितच कधीमधी येतो नि रात्रीचा गूढ अंधार चिरल्यासारखा वाटतो. घरातली म्हातारी-कोतारी आजी कानांवर हात ठेवून लागलीच पुटपुटते, ' शिव, शिव, शिव, शिव ! ' टिटवीचा फेरा आणि तिचे ओरडणे, म्हणजे भविष्यातल्या अशुभाचा इशारा, अशी जुनी समजूत अजूनही जुन्या माणसांत जागी आहे.

काव काव करणारा कावळा, चिव चिव करणारी चिमणीतशी ' ट्टि ट्टि ट्टि ' करणारी टिटवी ! टिटवी असतेही लहान, ओंजळीत मावणारी. करड्या-तांबूस पाठीची आणि पांढऱ्या


गोऱ्या पोटाची. काळ्या-भुऱ्या तोंडाची आणि लालचुटुक डोळ्यांची. गालावर मात्र लाली लावल्यासारखे रक्तवर्णी पट्टे आणि पिवळे पिवळे लंबाडे पाय सुरेख दिसतात. पायाला बोटे आहेत पुढेच, मागे नाहीत. त्यामुळे तिला झाडाची फांदी घट्ट धरून वसणे अितर पक्ष्यांप्रमाणे जमत नाही. म्हणून टिटवीने तो नादच सोडून दिला आहे. ती नदीच्या, तळ्याच्या, समुद्राच्या काठी, रानात जमिनीवर राहते किंवा अफाट आभाळात घिरट्या घालीत वसते. गगनसंचार आणि भूमीविहार या दोन्हींतही पटाईत असते. टिटव्यांचा उडण्याचा वेग थक्क करणारा आहे. त्या ताशी तीस मैल वेगाने सहज उडू शकतात. पण वाऱ्याची अनुकूलता असेल तर अधिक वेगानेही उडू शकतात. असे सांगतात की, एकदा इंग्लंडहून आयर्लंडला निघालेली टिटव्यांची टोळी वाऱ्याच्या प्रचंड वेगाबरोबर केवळ बारा तासांत अमेरिकेला जाऊन पोहोचली. म्हणजे त्यांच्या उडण्याचा ताशी वेग पडला सदतीस मैल !

इतके कशाला, उत्तर ध्रुवावरील आर्क्टिक विभागातील टिटव्या वर्षाकाठी दोन वेळा एक हजार मैलांचा गगनसंचार सहजपणे करतात. ऋतुमानाप्रमाणे काही भागांतील टिटव्यांना देशांतर करावे लागते. अशा वेळी दरवर्षी वीस-बावीस हजार मैलांचे उड्डाण त्या करतात.

भटकी टिटवीण घरटे बांधीत नाही. घराच्या बाबतीत ती अशी विरक्त असली तरी अंडी घालण्याच्या सुमारास जमिनीत, नदीकाठच्या वाळूत लहानसा खड्डा खणते आणि त्यातच अंडी उबवीत असते. टिटवीण एका वेळी चार अंडी घालते नि उबवते. पण त्यातही एक गंमत असते. या चारही अंड्यांची टोके एकमे-

कांना भिडलेली असतात. कुणी एखादेवेळी खटचाळपणे ती विखरून ठेवली तर टिटविणीच्या ते लक्षात तत्काळ येते आणि ती परत जशीच्या तशी ठेवून देते.

अंडी मातकट रंगाची असतात, त्यामुळे जमिनीशी मिसळून जातात. चटकन ओळखू येत नाहीत. टिटवीण पिलांची आणि अंड्यांची काळजी घेण्यात दक्ष असते. माणसाची चाहूल लागताच ती स्वतःच जखमी होऊन पडल्याचे नाटक करते. माणूस दूर गेला की पुन्हा पंख पसरून उड्डाण घेते. कधीकधी हुलकावणी देऊन दुसरीकडेच अंडी घातली आहेत असे भासवते. हिकमती टिटवीण मोठी नाटकी असते.




पण गरुड पक्षी मात्र तिलाच फसवतो. तो काय करतो.? पाण्याकाठी उंचावर बसतो. टिटवी पाण्याजवळ घिरट्या घालीत एखादा मासा चटकन चोचीच्या चिमट्यात पकडते. झटकन वर उडते. पण तेवढ्यातच पटकन गरुड झेप घेतो आणि तिच्या चोचीतला मासा वरच्यावर पळवतो. बिचारी टिटवी पुन्हा पाण्याजवळ मासा पकडण्यासाठी घिरट्या घालू लागते.

टिटवी भटकी असली तरी तिचे स्मरण मात्र पक्के असते. आपली अंडी, निवाऱ्याचे ठिकाण किंवा परिचित माणसाचा आवाज ती चटकन ओळखते. एकदा त्यांच्या स्मरणशक्तीची परीक्षा घेतली गेली. मेक्सिकोच्या खाडीजवळ राहणाऱ्या टिटव्यांना धरून जहाजातून समुद्रात आठ–नऊशे मैल लांब नेऊन सोडले होते. पण काय आश्चर्य! सगळ्या टिटव्या न चुकता आपल्या मूळच्या वसतिस्थानास परत आलेल्या आढळल्या! भटकंतीत दूर दूर गेलेल्या नर–माद्याही परत एकमेकांना शोधून काढू शकतात!

टिटव्यांना लाभलेले हे दिशाज्ञान आणि स्मृती विलक्षणच आहे. एवढी तल्लख स्मृती जर सगळ्या विद्यार्थ्यांना लाभली तर परीक्षेची धास्ती वाटणार नाही, नाही का?

# गरुड



लहानपणी प्रभात फिल्म कंपनीचा ‘संत तुकाराम’ हा चित्रपट मी पाहिला होता. त्यातील अनेक गोष्टी आता लक्षात आहेत. अनेक विसरून गेलो आहे. परंतु कधीही विसरणार नाही असं शेवटचं दृश्य–संत तुकारामांच्या सदेह वैकुंठ प्रवासाचे–आणि त्यातही तुकारामाचे ते विमान, आणि त्यातही त्या विमानाचे अजस्त्र पंखांचे एंजिन–गरुड पक्षी ! धारदार नजरेचा, मोठाल्या डोळ्यांचा गरुड आजही मला जसाच्या तसा दिसतो.

आणखी एके ठिकाणी पाहिलेले चित्र आठवते. चित्रात भगवान विष्णू, देवी लक्ष्मीसह आकाश-संचार करत चाललेले आहेत, आणि त्यांना तसाच अजस्त्र गरुड पक्षी विमानातून नेतो आहे–असे दाखविलेले होते. या चित्रातलेही इतर बारकावे मी आता विसरून गेलो आहे, पण लक्षात आहे तो गरुड आणि त्याने आपल्या पायांत पकडलेला साप !

गरुडाबद्दल अशाप्रकारे भक्ती आणि धास्ती–दोन्हीही, लहानपणापासूनच माझ्या मनी सलत आहेत. गरुड विष्णूचे वाहन आहे. गरुड पक्ष्यांचा राजा आहे. अजस्त्र पंख, तीक्ष्ण नजर, आणि उत्तुंग वेगवान भरारी हीच राजेपणाची प्रशस्ती असेल तर खरोखरीच गरुड पक्ष्यांचा राजा शोभतो. अन्यथा ह्याच्यापेक्षा मोर, हंस, बुलबुल, असे किती तरी– सुंदर, देखणे व गाणारे, गुणी पक्षी राजा होण्यास लायक आहेत. पण पक्षीजातीत पंखावरूनच मोठेपण ठरवले जात असावे; आणि ते वरोबरही आहे. मग त्या दृष्टीने गरुड पास! गरुडाची भरारी विख्यात आहे. अती वेगवान झेपेला 'गरुडभरारी' म्हणण्याचा प्रघातच आहे.

गरुडास शिकारी पक्ष्यांच्या गटातील पक्षी मानतात. शिकार करावी आणि आपले भक्ष्य मिळवावे अशी याची रीत आहे. अर्थात शिकार करण्याचं कसब आणि वळ दोन्हीही अंगी असावे लागते. गरुड तसा महावलिष्ठ आणि झुंजार पक्षी आहे. तो क्षत्रिय योद्धाच आहे. दोन गरुडांचे जर युद्ध जुंपले तर ते भयानकच दृश्य असते म्हणतात. पंखांचे तडाखे, चोचींचे प्रहार, बोटांच्या नख्यांचे आघात एकमेकांना रक्तबंबाळ करून टाकतात म्हणे!

लढाईचे सोडा, एरवी जरी एखादा गरुडपक्षी आभाळातून झेपावत चाललेला असला तरी विमान चालल्याचा भास होतो आणि हवा कंप पावते. गरुडाचे उड्डाण खूप उंचीवरून सहजतेने चालते. पण जमिनीपासून थोड्या उंचीवरून उडताना त्याची सावलीही सरकत्या ढगांप्रमाणे भुईवरून सरकताना दिसते. 'सूं–मूं' असा ध्वनीही ऐकू येतो.

गरुड आकाराने मोठा तसाच रुबाबदार पक्षी आहे. त्याचे पंख आणि पाठीवरचा वर्ण काळसर करड्या रंगाचा असतो. पोटा-

कडील भाग मात्र पांढराशुभ्र दिसतो. शेपटी शरीराला शोभेशी लांबसडक असते. पंख आणि शेपटीच्या कडांना मात्र काळी किनार उठाव देते. चोच आणि नख्या काळचा कुळकुळीत व वाकदार आकड्यासारख्या असतात.

मानी व शूर असल्यामुळे दुसऱ्याने केलेली शिकार, किंवा कुचके–सडके अन्न, मास यांकडे गरुड ढुंकूनही पाहणार नाही. भुरट्या चोऱ्या हा पक्षी करीत नाही. याला दरवडा घालणे किंवा डाकूगिरी करणे विशेष पसंत दिसते. अंगात अतिशय ताकद असल्यामुळे हिरव्या कुरणात चरत असलेली कोकरेही सहज उचलून हा उडू शकतो ! हरिणांची पाडसे आणि गुबगुबीत ससेदेखील हा लांबवतो ! गरुडांच्या जातीत शुभ्र डोक्याचा एक गरुड असतो. तो तर महा-वस्ताद असतो. नदी-किनारी, समुद्रकाठी मोठमोठ्या डोंगरांच्या सुळक्यांवर हा वसतो आणि भिरभिरल्या तीक्ष्ण नजरेनं आजूबाजूला भक्ष्य शोधत राहातो. एखादा दमला–भागला पक्षी आढळला की हा झेप घालून त्यास घायाळ करतो. विजयाने जोराचा चीत्कार करतो. त्याची आरोळी ऐकून गरुडीण धावत–पळत येते. मग दोघे मिळून आनंदाने मेजवानी झोडतात!

कधी कधी हे जोडपे पाण्याजवळच्या उंचवट्यावर लपून बसते आणि पाण्यातला मासा तोंडात धरून एखादी टिटवी उडत चालली तर हे तिच्यावर हल्ला चढवतात आणि तिच्या तोंडातला मासा आपणच स्वाहा करतात ! चक्क चाचेगिरीच आहे ही !

परंतु अशा दुष्ट स्वभावाच्या गरुड पति-पत्नींचा परस्परांवर मात्र मोठा जीव असतो. एकदा जोडलेले नाते ते तोडत नाहीत. एकमेकांशी एकनिष्ठ राहातात. प्रेमाने संसार करतात. दोघे मिळून काटक्या–कुटक्या, गवत, पाचोळा इत्यादी घर बांध-

णीचे साहित्य जमवतात. दोघे मिळून उंच उंच वृक्षांच्या शेंडया-जवळ किंवा डोंगर-माथ्यावरच्या अवघड जागी भरभक्कम आणि ऐसपैस घरटे बांधतात. घरटे कसले, लहानशी झोपडीच ती !

झोपडीत गरुडीणबाई हिवाळयाच्या दिवसात हिरवट पांढुरकी रंगाची अंडी घालतात. फारशी नाही. थोडकीच अंडी घालतात– पण तीही एके वेळी किंवा लवकर लवकर घालत नाहीत. थोडया अंतराअंतराने घालतात. अधूनमधूनच ती दोघे मिळून उबवतात. त्यामुळे पिलेही अंतराअंतरानेच जन्मतात. लहान-मोठी अशी वाढतात.

गरुड आणि गरुडीण दोघेही भक्ष्य शोधून आणतात. पिलांना देतात. गरुड एखादा मोठा मासा आणून पिलांपुढे टाकतो आणि स्वतः एक मासा घेऊन बाजूला खात बसतो. पिले आपल्या आई-वडिलांचे अनुकरण तात्काळ करतात आणि पुढयातला मासा मट-कावतात !

जमिनीवर सरपटणाऱ्या सर्पांचा कर्दनकाळ म्हणजे गरुड ! केवढयाही उंचीवरून त्याला वळवळणारा साप दिसू शकतो आणि एका झेपेतच तो पटकन चोचीत उचलून पुढे जातो.

विष्णुशर्म्याच्या पंचतंत्रात बहिरीससाण्याने मुलगा उचलून नेल्याची गमतीदार गोष्ट आहे. पण ती कल्पित गोष्टच आहे. गरु-डाने मात्र खरोखरच एकदा नॉर्वे देशातील एका गावची चार-पाच वर्षांची, अंगणात खेळत असलेली– स्पॅनहिल्ड हॅनसन नावाची मुलगी उचलून नेल्याची घटना एकोणीसशे बत्तीस साली घडल्याचे नमूद आहे. खूप शोधाशोध केल्यावर ती मुलगी सुमारे हजार फूट उंचीवरच्या एका डोंगरमाथ्यावर आढळली. गरुडाच्या अंगी अस-लेल्या या अचाट शौर्य-धैर्यामुळे तो बलोपासकांचा व साहसी

योद्धयांचा आदर्श आणि आवडता पक्षी बनला असल्यास नवल नाही ! आपल्या कथा-पुराणात, प्राचीन साहित्यात व संस्कृतीत गरुडाला शुभ मानून अग्रगण्य असे स्थान दिलेले आहेच. ' खगेश्वर ', ' वैनतेय ' अशा नावांनी त्याला गौरविलेलं आहे. भारताप्रमाणेच सुमेरियन, हिटाइट, रोमन, इस्लाम आदी संस्कृतींनी देखील गरुडाला महत्त्वपद दिलेलं आहे. फ्रान्सचा पराक्रमी वीर नेपोलियन याने तर आपल्या ध्वजावरच गरुडाची नियुक्ती करून टाकलेली होती. गरुडचिन्हांकित पदके, शिक्के, किरीट, आदी कितीतरी गौरवास्पद वस्तू पूर्वी आणि आताही अभिमानाने बाळगण्याची प्रथा जगभर आहे.


प्राचीन वाङमयात गरुडाला देवाचा दूत म्हणूनही मान्यता दिलेली आढळते. भारतात कुठेही विष्णु-मंदिरात बाकदार नाकाचा, पाठीवर पंख असलेला मानवरूपी गरुड विष्णू-सन्मुख उभा असलेला दिसतो. त्याच्या नाकावरून असावे किंवा उडत्या गरुडाच्या चोचीवरून असावे.पण बाकदार नाक असलेल्या माणसाला ' गरुडनाक्या ' म्हणण्याची पद्धत आहे.

गरुडातही काही प्रकार आहेत. रंगरूपांचे भेद आहेत. काही गरुडांचा वर्ण पिंगट असतो आणि त्यावर सोनेरी छटा चमचमत असते. त्याची चोचही पिवळ्या रंगाची असते आणि शेपटी पांढरी-शुभ्र दिसते. हा गरुड करड्या रंगाच्या गरुडापेक्षा दिसण्यातही थोडा आकर्षक दिसतो. असा ' सोनेरी गरुड ' युरोपखंडात आढळतो. त्याला तिकडे ' गोल्डन ईगल ' म्हणतात.

भारताचा राष्ट्रीय पक्षी जसा मोर आहे तसा हा ' सोनेरी गरुड ' अमेरिकेचा राष्ट्रीय पक्षी आहे !

रानावनात, पहाडा-डोंगरात प्रामुख्याने वस्ती करणाऱ्या गरुडाला परमेश्वराने दीर्घायुषी बनवलेले आहे. अन्य लहान-सहान पक्षी दोन-अडीच वर्षेच जगतात, पण गरुड पक्षी मात्र खूप दिवस जगतो.

# घार



घारीची नुसती आठवण झाली तरी माझे उजव्या हाताच्या अंगठ्याजवळचे बोट हुळहुळते ! ठणकते ! निदान मला तरी तसे वाटते. मी होतो सहा–सात वर्षांचा. त्या वेळची ही धास्तीमय आठवण. त्या वेळी माझे हे बोट आताच्या सारखे राठ– निबर नव्हते, कोवळे लुसलुशीत होते.

तर झाले होते काय की, आम्ही घरची, शेजारची बरीच मंडळी त्या दिवशी विष्णुपदास गेलो होतो जेवायला.

आता विष्णुपदी जेवायला जाण्यात काय गंमत असते, नि केवढा तो आनंदसोहळा असतो याची कल्पना माझ्यासारख्या पंढरीत राहिलेल्या– वाढलेल्या मुलांशिवाय दुसऱ्यांना कशी येणार ? तर तीही थोडक्यात सांगतोच.

पंढरपूर क्षेत्र चंद्रभागेच्या काठी उभे आहे. या चंद्रभागेच्या पात्रात गावापासून पाऊण–एक मैलावर विष्णुपद आहे. पाण्यात बांधलेले ऐसपैस चिरेबंदी छान देऊळ. मार्गशीर्ष महिन्यात देव म्हणे वस्तीलाच्च तिथे राहतात. केवढी रसिकता !

मग पंढरीचे लोक शिदोरी घेऊन नावेतून महिन्यातून अधूनमधून विष्णुपदी सहभोजनास जातात. महिनाभर हा सोहळा चालतो. आम्हा लहान मुलांना वाटे की, विष्णुपद बाराही महिने असावे! चंगळ! तर एकदा आम्ही विष्णुपदास गेलो. चंद्रभागेच्या काठच्या प्रशस्त सुंदर वाळवंटात शिदोरी सोडून जेवायला बसलो. विष्णुपदास या महिन्यात केवळ माणसेच येतात असे नाही, तर पारधी, भिकारी नि घारीही खूप येतात. मी जेवत होतो. हातात खमंग भजे होते. कुठे तरी वेंधळ्यागत पाहात होतो. आभाळातल्या घारीने वेध घेतला नि एक झेप घेऊन माझ्या हातातले भजे पळवले. त्या वेळी झालेल्या तिच्या प्रचंड उघडझापीने मी दचकलो. भेदरलो. बोटांच्या चिमटीतले भजे हिरावून घेताना तीक्ष्ण चोचीचा तडाखाही चिमुकल्या बोटाला खावा लागला. बोटातून चक्क रक्त वाहू लागले.

आणि म्हणून अजूनही घार म्हटली की माझे ते बोट हुळहुळते. ठणकते. शिकारी पक्ष्यांच्या टोळीतला हा एक घार पक्षी! हिंस्र वृत्तीचा, दणकट शरीराचा. भयानक वाटणारा!

सुमारे दोन-अडीच फूट लांबीची घार गिधाडाएवढीच असते. काळपट तपकिरी रंगाने हिचे सारे अंग माखलेले असते. तसल्याच रंगाचे शेपूट, पण ते दुभंगलेले असते. चोच काळसर, टणक आणि वाकदार दिसते. ती भलतीच धारदार, तीक्ष्ण असते. घारीचे डोळे तेल घातल्यागत सतेज दिसतात. घार कितीही उच उडत असली तरी जमिनीवर वळवळत असलेले कृमी-कीटक, बेडूक, ससे आणि पाण्यातले मासे यांच्यावर तिचे लक्ष असते. तीक्ष्ण दृष्टी असलेल्या माणसाच्या नजरेसही 'घारीची नजर' अशी उपमा देतात ती त्यामुळेच!

चोचीचा वरचा भाग आणि पायाचा पंजा पिवळसर रंगाचा असतो. घारीची बोटेही वळकट, लांब आणि नख्या आकडेबाज असतात. पायास पुढच्या बाजूस तीन व मागच्या बाजूस एक अशी चार बोटे घारीला असतात. त्यामुळे ती उंच झाडांवर किंवा पहाडाच्या टोकांवर गच्च नख्या रोवून बसू शकते. पंखांचा पसारा भरदार असतो आणि ते सशक्तही असतात. त्यामुळे घार कितीही वेळ आणि कितीही उंच आकाशात उडत राहू शकते. तिचे पल्लेदार पंख आणि त्यांचा झपाटा यामुळे ती गरुडासारखीच हवेत कंप उठवत उडते. उडण्यात ती पटाईत असते.

परंतु आभाळात भिरभिरत राहणाऱ्या घारीलाही आपल्या घराची, पिलांची ओढ असते. घारूबाई आणि घारोपंत दोघे मिळून प्रेमाने राहातात. नीटनेटकेपणाने प्रपंच करतात. दोघे मिळूनच काटक्याकुटक्या, तारांचे तुकडे, गवत, पाचोळा अशा वस्तू गोळा करतात आणि हिवाळ्याच्या सुरुवातीस किंवा उन्हाळ्यात घरटे बांधतात ; तेही आकाराने मोठे, प्रशस्त असते. उंच उडणारा हा पक्षी घरटेही उंचच बांधणार ! झाडांच्या शेंड्यांजवळ किंवा गगनभेदी इमारतींच्या छपराजवळच्या वळचणीत ही घरटी बांधली जातात. घार तशी रानावनात, दऱ्या–खोऱ्यात नि गावठाणाजवळही वस्तीला असते.

घरट्यातच दोन-चार अंडी घालते. ती गुलाबी छटेची पांढरट दिसतात. त्यावर किंचित पुसट तांबूस तपकिरी डागही असतात. घारूबाई आणि घारोपंत आळीपाळीने ती उबवतात–राखतात. पिलांचे भरण–पोषण करतात. एखादे बेडकाचे पोर, एखादा मासा, एखादा ससा पिलांसाठी पळवून आणतात, आणि त्यांना धष्टपुष्ट बनवतात. आभाळात सारख्या घिरट्या घाल-

णाऱ्या या पक्ष्यांची वत्सलता मोठी हृद्य आहे. थोर आहे.

‘ घार फिरते आकाशी
तिचे चित्त पिलापाशी !’

अशी तिच्या मातृत्वाची भलावण संतांनीही केलेली आहे.

पण पिलांशी प्रेमळ असणारी घार बाकीच्यांशी मात्र वस्तादगिरीने वागते. तुमच्या गवाळपणाचा फायदा घेते. उघडे-वाघडे खाद्यपदार्थ झडपेसरशी पळवते. घारीला सारे काही चालते. ती शाकाहारी नि मांसाहारी दोन्हीही आहे! वळवळणारी गांडुळे आणि कोंबडीची पिल्ले ती हां हां म्हणता पळवते.

घारीचे खेळही मजेशीर असतात, जोरदार वाऱ्याने हवेत भोवरे निर्माण झाले म्हणजे घार खुषीत येते. अशा वेळी छत्री मिटून घेतल्याप्रमाणे ती आपले पंख अंगाशी मिटून घेते. आणि भोवऱ्यात स्वतःला झोकून देते. मग हवेच्या चक्री वेगाने ती आपो-आपच अंतराळात गिरक्या घेऊ लागते. घारीला अशा गिरक्या घेण्यात खूप गंमत वाटते.

कधी कधी पुष्कळशा घारी जोरदार वाऱ्याने झुकणाऱ्या झाडांच्या शेंड्यांवर बसतात आणि ‘ झू–झोका ’ घेतात !

चिऊ-काऊपेक्षा मोठ्या दिसणाऱ्या घारीचे आकर्षण बाळाला असते. म्हणून तो म्हणत असतो–

“ ये ये घारी माझ्या दारी
चारा पाणी घे तरी ! ”

# गिधाड

आपण कुठे तरी प्रवासाला चाललेलो असतो. हवा छान असते. गाडीत खिडकीजवळची जागाही मिळालेली असते. गर्दी बेताचीच असते. आणि या सगळ्यांमुळे आपले मनही प्रसन्न, आनंदी असते.

खिडकीतून आपण बाहेरची सृष्टिशोभा पाहण्यात दंग होतो. झाडे पळत पळत मागे जातात. डोंगर गरगर फिरत दृष्टिआड होतात. नदी भर्रकन् येते नि भर्रकन् जाते. शेत-मळे कधी एकजटीने टोळी करून तर कधी एकटे दुकटे अधूनमधून भेटत राहतात. तशातच एखादे गाव येते. लालचुटुक कौलारांची घरे दिसतात. गुरावासरांची नि माणसांची वर्दळ वाढते. पडकी वेस, अरुंद रस्ता, पाणवठा ही परिचित दृश्ये दिसतात नि पुसतात. असे सारखे सुरू असते.

पण आपण एकाएकी बसल्या जागेवरच शहारतो! किळसतो.

तसेच व्हावे असेच ते दृश्य असते. गावाबाहेर ओढ्या-नाल्याच्या काठचे, उघड्या–बोडक्या माळावरचे.

एक नाही, दोन नाही; तर दहा वीस, प्रचंड पंखांचे, भयंकर चोचींचे आणि केवढे तरी मोठमोठ्या आकारांचे पक्षी माळावर गोळा झालेले असतात. आणि पुढ्यातला हाडा-मासाचा मोठा सांगाडा कुरतडत असतात. त्याचे लचके तोडत असतात. उजाड माळाला आणखीनच भकासपणा आलेला असतो! प्रवासातली

आपली प्रसन्नता चटकन् मावळते आणि आपले मन उद्विग्न बनते, उदास होते.

गिधाडाची भूक अशीच मेल्या मासावर भागते. ते त्यावर तुटून पडते. म्हणूनच अधाशी माणसाला गिधाडाची उपमा देतात!

गिधाड दिसायलाही कुरूप आणि बेढब आहे. क्रूर उग्रपणा त्याला पाहताच जाणवतो. मोराच्या आकाराचा हा पक्षी काळपट, उदी रंगाचा असतो. पाठीवरचे पंख राठ नि जाड असतात. ते भलतेच सशक्तही असतात. लांब नि टोकदार पंखांनी गिधाड उंच नि दूरवर भराऱ्या मारू शकते.


गिधाडाच्या पंखात केवढी शक्ती असते, याची जटायूच्या पंखांवरून कल्पना यावी! जटायू 'गृध्रराज' होता! 'गृध्र' किंवा 'गीध' किंवा 'गीद्ध' म्हणजे गिधाड! रावण सीतेला कपटाने पळवून नेत असताना जटायूने महाबलाढ्य रावणाशी सर्वस्वाने झुंज घेतली. हीन कृत्याचा सक्रिय निषेध केला. प्राणार्पणाच्या तयारीनें अन्यायाविरुद्ध, कपटाविरुद्ध उभा ठाकला! गर्वोन्मत्त रावणाने जटायूचे पंख वरच्यावर तलवारीने छाटले आणि आपला मार्ग मोकळा करून घेतला.

पंखहीन, जखमी, रक्तबंबाळ जटायू धरणीवरच्या धुळीत रामरायांची वाट पहात, डोळ्यांत प्राण आणून तडफडत राहिला. सीतेच्या वियोगाने त्रिद्ध बनलेले रामप्रभू सीतेचा शोध घेत घेत रानावनातून सैरभैर हिंडत असताना, सीताहरणाची पहिली वार्ता त्यांना या जटायूनेच दिली आणि प्राण सोडला! रामायणात जटायू अमर झाला!

जटायूच्या थोरपणाला शोभेल अशी कृती त्याच्या गृध्र-

जातीत अन्य कोणी केल्याचे स्मरत नाही. पण अंगापिंडाने मात्र हा पक्षी थोराड, तसाच भक्कम आहे. पायाच्या नख्या आणि तीक्ष्ण चोच हीच त्याची आयुधे. चोच टोकाला किंचित वाकदार, बाकी टणक, करडी नि आखुड. मानेपासून ते चोचीपर्यंत भाग मासल, पांढरा-गुलाबी व विनकेसांचा असतो. त्यामुळे तो काही तरीच दिसतो. गोटा केल्यासारखा तुळतुळीत !

आकारमान आणि उग्रपणा यावरून गिधाड शूर असेल अशी कल्पना होते. जटायूच्या कथेने त्याला पुष्टीही मिळते. पण एखादाच जटायू ! बहुतेक गिधाडे भित्री आणि घाबरट असतात. खाद्यवस्तूंवर झडप घालण्यात मात्र तरबेज. शरीराच्या मानाने डोळे लहान, पण नजर तीक्ष्ण. खूप उंचावरूनही खालचे भक्ष्य



सहज टिपण्यात पटाईत. मात्र सर्वांत गिधाडाचे घ्राणेंद्रिय अतिशय तीव्र असते. कुजक्या, सडक्या मासाचा वास त्याला चटकन येतो नि निसर्गाचा हा सफाईवाला तेथे तात्काळ हजर होतो !

गिधाडाचे रंग-रूप नि खाणे-पिणे ओंगळ असले तरी माणसाच्या जगातली स्वच्छता ठेवण्यास त्याचा फारच उपयोग आहे. नाही तर रोगराई वाढली असती नि माणसांना नाकाला फडके बांधूनच फिरावे लागले असते !

गिधाडांना मेलेल्या पशूंचे वा माणसांचे मास आवडते नि त्यातल्या त्यात हाडातील मज्जा खूपच आवडते. म्हणून ते काय करते, तर हाडके घेते आणि खूप उंचीवरून खाली दगड-धोंड्यावर टाकते. त्यामुळे हाड फुटते नि मग गिधाडाला मज्जा चाखायला मिळते. आपल्या पोराबाळांना ही मज्जा खाऊ म्हणून देण्यात गिधाडीणबाईना भलताच आनंद असतो ! गिधाडीणबाई आणि गिधाडराव मिळून घरटे बांधतात. उंच झाडावर किंवा पडक्या हवेलीच्या उंच छपराजवळ ते कावळ्याच्या घरट्यासारखेच पण मोठे असते. ऑक्टोबर ते मार्चपर्यंत हा उद्योग चालतो. गिधाडीणबाई एकच अंडे घालतात. त्याचा रंग पांढरट आणि त्यावर तांबूस उदी ठिपके असल्यासारखा असतो.

गिधाडाची पचनशक्ती मात्र अजब असते. मोठमोठ्या जनावरांचे कच्चे मास ते पचवतेच ; पण मोठमोठी हाडेही गिळंकृत करून टाकते ! पारशी लोकांच्या स्मशानातला हा मानकरी स्वच्छतेच्या दृष्टीने मात्र माणसांचा मित्रच आहे.

# घुबड



वालकवींनी 'भारद्वाजा 'स उद्देशून कविता लिहिली. पोपट, कोकिळा, मोर, हंस ह्या पक्ष्यांनीही अनेक कवींना स्फूर्ती दिली. कुणाला त्यांचा रंग आवडला, तर कुणाला त्यांचा गोड गळा आवडला. कोंवड्यांची रुवाबदार चाल आणि घारीचीअस्मानी भरारी कुणाला आवडली, तर आपण तेही समजू शकतो. पण गोविंदाग्रजांची आवड-निवड मात्र भलतीच, जगावेगळी ! त्यांनी ह्या साऱ्या गुलजार पक्ष्यांना बाजूला सारले आहे आणि ओसाडीतल्या भयाण भीषण दिसणाऱ्या घुवडोजीला ते आळवत आहेत—

" घुवडा, बोल रे घू घू ।
नकोत चिमण्या-राघू !"
एकान्ताला का पतकरशी ?
समाधीत या कधिचा रमशी ?
कुठे असा संन्यासहि शिकशी ?

'घू घू' वाचूनि दुसरे काही
तुझे न देशी अुमगू !
शिष्य तुझा मी झालो म्हणूनी,
नि:संगाची संगत धरुनी,
काळोखाची राख फासुनी,
सांग तुझा गुरुमंत्र मला तो,
"करी एकदा घू घू ! ..."

गोविंदाग्रजांच्या दृष्टीला घुबडोजी एक योगी, स्थितप्रज्ञ दिसले. त्यांनी कवितेच्या प्रारंभीच म्हटले आहे–

"या निशा सर्व भूतानां
तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि
सा निशा पश्यतो मुने : ।।

या प्रवचनाची आठवण घुबडाचा शब्द ऐकून होऊ नये असे त्या विचाऱ्याने कोणते पाप केले आहे बरे ? आमच्या दृष्टीचा रंग त्यावर का लावायचा ?"

बाकी हे मात्र खरे आहे. न देखता, न जाणता घुबडाशी ओळख होते ती त्याच्याविषयी भलते सलते अमंगल ऐकूनच ! लहानपणी अशीच एक अफवा ऐकलेली अद्याप स्मरते आहे. ती अशी : घुबडाला जर खडा फेकून मारला तर तो खडा ते घुबड म्हणे अलगद झेलून घेते आणि नदीच्या काठी जाऊन खडका-वर उगाळत असते. खडा जसजसा झिजत जातो तसतसा खडा फेकणारा इकडे खंगत राहतो... आणि अखेरीस खड्याबरोबरच तोही झिजून झिजून संपतो...

आता या अफवेतला खोटेपणा उमगतो; पण त्या वेळी मात्र ते खरेच वाटले होते आणि त्यामुळे घाबरायलाही झाले होते. चुकून कधी घुवडाला खडा मारायचा नाही असेही, भयापोटी, मनाशी ठरवून टाकले होते.

कित्येक दिवस घुवड मला भेटलेच नव्हते आणि जेव्हा भेटले तेव्हा मी त्याला ओळखलेही नव्हते. हुरडा खायला म्हणून एकदा रानात गेलो असताना विहिरीच्या कड्याच्या कपारीत दोन भेदक डोळे लकाकताना दिसले होते. मी पाहिले आणि नवलाईची गंमत दाखवावी म्हणून सोबत्याला बोलावून दाखवले; पण तो त्या वेळी तरी माझ्यापेक्षा ज्ञानी निघाला. म्हणाला, "शू ! पाहू नकोस तिकडे."

"का ?"

"अरे, घुवड आहे ते !" दबक्या आवाजात त्याने सांगितले.

"मग ?"

"घुबडाचे तोंड पाहू नये कधी. अशुभ असतं !"

घुवडासंबंधीचा हा आणखी एक गैरसमज. घुवड राहते ओसाडीत. पडक्या मोडक्या विहिरी, वाडे, देवळे, तशाच खडकातील खबदाडी, निर्जन रानावनातील झाडे, घळी, बिळे यांतून त्याची वस्ती असते. सहसा घुवड कधी दिवसाउजेडी बाहेर पडत नाही. ते आहे निशाचर ! रात्र झाली की, त्याचे अुजाडते, मग अंधेऱ्या रात्री घिरट्या घालत राहते.आपले भक्ष्य शोधते. लहान लहान पशू, किडे, उंदीर, घुशी हे याचे खाद्य ! याचा झपाटा असा की, एखादा लहानगा प्राणी दिसताच झडप घालून पकडते आणि सरळ गट्टम करून टाकते. नंतर मात्र, स्वस्थपणाने जनावरे रवंथ करत बसतात तसे बसून, आतल्या आतच त्या प्राण्याचे

मास खाऊन त्याची चामडी, केस, टणक हाडके यांचा लगदा बाहेर थुंकून टाकते. भुरकट रंगाचा विद्रूप दिसणारा हा पक्षी असतो मोठ्या घारी–गिधाडाएवढा. गुडघे पोटाशी घेऊन बसलेल्या, वटवटीत डोळ्यांच्या माणसासारखे याचे ध्यान दिसते. वाटोळा चेहरा आणि वाटोळे डोळे. ते देखील माणसासारखे किंवा मोटारीसारखे थेट पुढे! इतर पक्ष्यांना कसे चोचीच्या डाव्या–उजव्या अंगाला लहानसर डोळे असतात. त्यामुळे इकडे-तिकडे पाहताना त्यांनी केवळ बुबुळे फिरवली तरी चालते. पण थेट समोर डोळे असणाऱ्या घुवडाला मात्र माणसासारखीच मान वळवून पाहावे लागते. घुवडांच्या निरनिराळ्या जातीत डोळ्यांच्या बाहुल्यांचे रंगही निरनिराळे असतात.

एकूण शरीराच्या आणि चेहऱ्याच्या मानाने चोच मात्र बारीक, आखुड असते, पण टोकाला आकडेबाज असणारी ही चिमुकली चोच असते मात्र कणखर, वळकट. मानही बसकी नि आखुड; त्यामुळे तोंड छातीवर टेकल्यासारखे दिसते. कान मात्र डोळ्यांप्रमाणेच मोठे असतात. त्यावर पातळ पडदा असतो. आभाळातून उडताना हा पडदा घुवडाला बाजूला सारता येतो अशा वेळी हे मोठे कान दिसू शकतात.

डोळे मोठे गरगरीत दिसले तरी नजर मात्र तेवढी तीक्ष्ण, धारदार नाही. मोठ्या डोळ्यांचे पण अधू दृष्टीचे घुवड कानाने मोठे तिखट असते. कसलीही चाहूल त्याला पटकन लागते आणि त्यामुळे ते पटकन आपले सरक्षण करू शकते.

फरचा ओव्हरकोट घातल्यासारखे केसाळ पिसांनी त्याचे सारे शरीर नखशिखान्त झाकलेले असते. माथ्यावर नि पायांवरही मऊसूद केस असतात. त्यामुळे दुसऱ्याची चाहूल सावधपणाने

टिपणाऱ्या घुवडाची चाहूल मात्र इतरांना लागत नाही.

घुवडाची पिसे इतर पक्ष्यांप्रमाणे वर्षाच्या वर्षाला झडत नाहीत. तर दोन वर्षांतून एकदा झडतात. एरवीच दिसायला दुर्मिळ असणारा हा पक्षी पिसे झडल्यावर मग कुठून दिसायला?

घुबडाची मादी पालापाचोळ्यात, सांदी-कोपऱ्यात, विळात अंडी घालते. कारण नरमादी दोघांनाही घरटे बांधायचा कंटाळा! मादी अंतराअंतराने अंडी घालते, त्यामुळे लहानमोठी पिले तिच्या अवती-भवती दिसतात. घुवडाच्या 'घू घू' घूत्काराने वातावरण भरून जाते आणि त्याच्याविषयीच्या दंतकथांनी गूढ-अद्‌भुत-पणाने मनही थरकून जाते.

खूप दिवस जगणाऱ्या पक्ष्यांपैकी घुवड हे एक आहे. ते दीर्घायुषी असते.

५२०५५३५ /

# वटवाघूळ

खरे म्हणा–खोटे म्हणा, सांगणाराचा दोष नाही, ऐकणाराचा नाहीच नाही. लिहिणाराचा नाही. तर वाचणाराचा कसा असेल ? पण जुनीपुराणी कहाणी आहे. एकदा एका अरण्यामध्ये पशू आणि पक्षी यांच्यामध्ये काहीतरी कारणांवरून भांडण जुंपले त्यातून युद्ध उद्भवले. दोन्ही पक्ष निकराने लढू लागले. सगळे पक्षी एकीकडे, सगळे पशू एकीकडे, पण एक लबाड पक्षी असा होता, की तो कुणीकडेच सामील झाला नव्हता. तो काय लबाडी करायचा, की ज्या पक्षाची सरशी त्या बाजूचा पारशी ! मग कधी पशूंच्या बाजूला हा दिसे, तर कधी पक्ष्यांच्या घोळक्यात असे ! त्यामुळे लढणाऱ्या पशू-पक्ष्यांनाही कळेनासे होई की हा कोणाचा ? पण शेवटी त्याची ही लबाडी उघडकीस आली, आणि सगळ्या पशू-पक्ष्यांनी मग त्याच्यावर एक प्रकारचा बहिष्कारच टाकला. कोणीच त्याला आपल्यात घेईना. काही आडदांड पशू-पक्ष्यांनी तर त्याला हाणून मारून लांब पिटाळून लावले. बिचारे लबाड पाखरू ! फटफजिती झाल्या दिवसापासून जे तोंड चुकवून पळाले ते आजतागायतसुद्धा वर तोंड करून, दिवसा-उजेडी कुठे फिरकत नाही. काळ्या रात्री उठते, काळोखातच फिरते. या रात्री उठून फिरणाऱ्या पक्ष्याचे नाव आहे वटवाघूळ ! वटवाघूळ घुबडाप्रमाणेच दिवाभीत आहे. दिवसा-उजेडी स्वत:ला गर्द पानांच्या झाडाच्या फांदीला उलटे टांगून घेऊन स्वस्थ राहते. लबाडीचे



प्रायश्चित्त घेण्यासाठी ही तपश्चर्या की काय, कुणास ठाऊक !

तथापि, खरी गोष्ट अशी आहे, की वटवाघुळाच्या अधू-नजरेला सूर्यप्रकाश सहन होत नाही, म्हणून ते दिवसांधळे बनून राहते. आणि ते एकेकटे क्वचितच राहते. जवळजवळ नाहीच राहत. वटवाघुळांचा कंपूच्या कंपूच असतो. जेव्हा क्वचित कधी एखाद्या ओसाडच्या देवळाच्या छताला उलटी लटकलेली वट-वाघुळे दृष्टीस पडतात तेव्हा भय आणि नवल वाटते. एखाद्या झाडाच्या फांद्याही लगडून गेल्यासारख्या दिसतात. एक नाही, दोन नाही– तर शेकडो वटवाघुळे कळप करून राहतात.

गोष्टीतल्या वटवाघुळाला व पशूंना पक्ष्यांना फसवणे सोयीचे झाले. त्यालाही एक कारण आहे ; आणि ते म्हणजे त्याची शरीर-

रचना. साऱ्या जीवनसृष्टीमध्ये वटवाघूळ हाच एक जीव असा आहे, की जो स्तनधारी असूनही आभाळात उडू शकतो आणि उडतो तरी किती चपळाईने ! मी मी म्हणणाऱ्या पक्ष्यांना उडण्यात हा मागे टाकील. याच्या उड्डाणातले रहस्य याच्या कानात दडलेले आहे. वटवाघुळाचे कान अती संवेदनशील आहेत. उडताना वटवाघूळ इतका सूक्ष्म हलका आवाज काढते की, माणसालादेखील तो ऐकू येत नाही. परंतु त्या आवाजाच्या ध्वनीलहरी एक सेकंदास चाळीस ते पन्नास हजारांहून अधिक प्रमाणात निर्माण होऊन फैलावतात. सभोवतालच्या वस्तूंवर त्या आदळून त्यांचा प्रतिध्वनी उलट वटवाघुळाच्या तिखट कानावर येतो आणि त्यामुळे उडताना वाटेत येणारे अडथळे त्याला आधीच समजतात. या विशेष ज्ञानामुळे, असे म्हणतात, की वटवाघुळाच्या डोळ्यांवर पट्टी बांधली तरी ते तेवढ्याच वेगाने उडू शकते !

पंख असले तरी बाकीचे शरीर पशुसारखे आहे. चार पाय असतात आणि तोंड तर हुबेहूब उंदीरमामासारखेच दिसते. उंदीर मामाला जर पंख फुटले तर तो वटवाघुळासारखाच दिसेल !

भुरकट काळ्या रंगाचा हा पक्षी तसा प्रकृतीने अशक्त, नाजूक **आहे**. स्वभावानेही शांत आहे. शेपटी आणि कानाचा भाग सोडला तर साऱ्या शरीरावर मऊसूद केस असतात. डोळे बारीक, नाक टोकदार आणि दात विलक्षण धारदार असतात. या धारदार दातांच्या साहाय्यानेच वटवाघूळ आपले भक्ष्य सहज चावून गिळून टाकते. छत्रीसारखे पंख प्रचंड असतात. इतके प्रचंड की पसरल्यावर पाच–सहा फूट लांब सहज भरतील !

वटवाघुळाचे पुढचे पाय लांब असतात, आणि त्या मानाने

मागचे आखूड असतात. पण या आखूड पायाच्या पंजांची नखे मोठी कट्यारी आणि आकड्यासारखी वळलेली असतात. त्यामुळेच त्याला स्वतःला झाडांवर उलटे टांगून घेता येते. वटवाघूळ पक्षी असले तरी मादी अंडे घालत नाही. पशूप्रमाणे पिलू जन्मते. आणि तेही वर्षातून एक! झाडावर उलटे टांगून घेतलेल्या अवस्थेतच पिलाचा जन्म होतो. पण मादी त्याच्या जन्माच्या वेळी अगोदर शेपटी आणि मागचे पाय यांच्या साहाय्याने एक लहानशी टोकरी बनवून घेते. त्यामुळे हे पिलू खाली पडत नाही.

जन्मल्यानंतर दोन आठवड्यांनी पिलू डोळे उघडते. तोवर मादी त्याला आपल्या छातीशी धरूनच वाढवते. दूध पाजते. सांभाळते. नंतर मात्र पिलाला उलटे टांगून ती भक्ष्य शोधायला बाहेर पडते. वटवाघुळांची वस्ती जगभर आहे. आकार, रंग, रूप, या वरून वटवाघुळातही बऱ्याच जाती आढळतात. तथापि मोठे आणि छोटे ह्याच दोन प्रमुख जाती आहेत.


लहान वटवाघुळे मांसाहारी असतात. ते कीड-मुंगी, जीव-जंतू खातात. पण मोठी वटवाघुळे शाकाहारी असतात. ती झाडाचा पाला आणि फळे खाऊन राहतात. काही लांब जिभेची वटवाघुळे तर फुलांतील केवळ मध आणि पराग खाऊनच गुजराण करतात.

मोठ्या कावळ्याएवढे वटवाघूळ आपल्याकडे दिसते, पण सर्वात मोठ्या आकाराचे वटवाघूळ इंडोनेशियात आढळते. त्याला 'उड्‌न सियार' असे म्हणतात. पंख पसरल्यावर ते पाच-सहा फुटांची जागा व्यापून टाकते. 'वॅम्पायर' जातीचे वटवाघूळ भयानक असते. त्याला 'सैतान' म्हणतातच. हे मेक्सिको आणि मध्य अमेरिकेत आढळते. जिवंत प्राण्यांचे रक्त पिऊन हे जगते.

असे सांगतात की झोपलेल्या माणसावर हे झडप घालते आणि त्याच्या पायाच्या तळव्याला जखम करून त्याचे रक्त पिते. सैतानच ! पण अशी एखादी जात. बाकी, वटवाघुळही माणसाला साहाय्यकारी मित्रच ठरले आहेत. शेतीला नुकसानकारक ठरणारी कीड, जंतू हे खाऊन टाकतात. वटवाघुळांची वस्ती जेथे असते तेथे मलेरियाचे डास कधीच फिरकत नाहीत. नव्या विज्ञान–काळातल्या वटवाघुळांनी 'रडार' सारख्या यंत्राचा शोध लावण्याच्या कामी न कळत साहाय्य केले आहे. वटवाघुळांवरूनच 'रडार' सारख्या यंत्राची कल्पना संशोधकांना सुचली !

वटवाघूळ हा एक चमत्कारिक प्राणी आहे हेच खरे.

# शहामृग



मूळाक्षरे शिकताना दोन अक्षरांची ओळख झक्क झाली. एक शेंडी-फोडचा 'श' आणि दुसरा पोटफोडचा 'ष'.

पण ही दोन्हीहीअक्षरे मोठी फसवी आणि लवाड. आता एवढ्या प्रौढ वयातही मलाच नव्हे तर भल्याभल्यांनाही ती जाता जाता चकवतात आणि लिहिता लिहिता गोंधळ उडवतात. मग पुरुषोत्तमाचा पुरुशोत्तम बनतो, किंवा षट्कोणाचा शट्कोण होतो. पौरुषाचे पौरुश होते किंवा शहाण्णव कुळी षाण्णव बनते. शेंडीफोडचा की पोटफोडचा ? पोटफोडचा की शेंडीफोडचा ?.... अजूनही गोंधळ उडतोच.

पण ह्या बुद्धि-फोडचा अक्षराला मी लक्षात ठेवले आहे ते 'श' रे शहामृगाचा, आणि 'ष' रे षट्कोणाचा या अंकलिपीतल्या रंगीबेरंगी चित्रांवरूनच. शहामृगाला मी प्रथम पाहिले ते अंकलिपीतल्या चौकटीतच. व पाहताक्षणीच ध्यानात भरली ती त्याची 'श'च्या माथ्यावर असलेल्या उभ्या रेघेसारखी उंचच्या उंच **मान** !

शहामृग हा पक्षी सर्व पक्ष्यांतच उंच आणि मोठा पक्षी असावा. किडमिडीत पायांचा शहामृग सात-आठ फूट उंचीचा आणि दोन-तीनशे पौंडांचा असतो. पायांसारखी मानही लांब-लचक. उंटासारखीच. पक्ष्यांतला उंटच म्हणा ना !

दिसायला ध्यान उंटासारखे दिसले तरी धावायला मात्र घोड्यासारखे आहे. किंबहुना घोड्यापेक्षाही शहामृगाच्या धावण्याचा वेग जास्ती असतो. तासाला साठ मैल या वेगाने तो धावू शकतो. म्हणजे हा धावणारा पक्षी आहे.

पक्षी तरी का म्हणायचे, तर पाठीवर पिसांचे गाठोडे असते म्हणूनच. बाकी या पिसांनी शहामृगाला मुळीच उडता येत नाही. कसे येणार ? एवढे आंगाबोंगा शरीर कसे तरंगणार ? पण पिसे मात्र देखणी, सुंदर. मोरपिसांच्याप्रमाणे शहामृगाच्या पिसांनाही भाव फार. टोपीत किंवा हॅटमध्ये पिसांचा तुरा खोवणारे आंबटशौकी पुष्कळच. अशांची मागणी शहामृगांच्या पिसांना फार. कुठे तरी वाचल्याचे आठवते आहे की एक शेर वजनाच्या पिसाऱ्यांना पंचाहत्तर ते ऐंशी रुपये पडतात म्हणून ! नराचे चमकदार काळे, तर मादीचे बदामी रंगाचे पर असतात.

पण या देखण्या पिसांमुळेच शहामृगाला शिकाऱ्यांच्या माऱ्यापासून सदासर्वदा सावध राहावे लागते. म्हणतात की शत्रूपासून जीव वाचवण्यासाठी शहामृग आपली लांबलचक मान जमिनीवरच्या धुळीत किंवा वाळूत खुपसून पडतो आणि संकट टाळतो. पण या समजुतीत काही तथ्य नाही असेही म्हणतात. कारण मान लपवली तरी भले मोठे शरीर कोठे लपवणार ?

कामटीसारख्या पायांना पुढे दोनच बोटे असतात. तीही लांबसडक आणि बोथट नखांची; त्यामुळे तो लांबलांब ढांगा टाकून पळू शकतो. त्याची अेकेक ढांग पंचवीस पंचवीस फुटांची असते. हा ढांगुळा पक्षी बहुधा हरिणांचा कळप वा झेब्र्यांचा जथा यांच्याबरोबर राहतो. त्याचे कारण असे की शत्रूची चाहूल या प्राण्यांच्यामुळे शहामृगालाही चटकन लागते. पाय हेच शहामृगाचे शस्त्र आहे. आपल्यावर चाल करणाऱ्याला पायाच्या तडाख्याने तो घायाळ करून सोडतो.

नर आणि मादी दोघे मिळून आळीपाळीने आपल्या अंड्यांची राखण करतात. जमिनीवरच खोलगट भाग पाहून मादी अंडी घालते. शहामृगांप्रमाणे त्यांची अंडीही आकाराने मोठीच असतात. शहामृगीचे एक अंडे म्हणे कोंबडीच्या अंड्याच्या निदान पंचवीस पट तरी मोठे असते आणि चार-पाच पौंडापर्यंत तरी त्याचे वजन असते। अंडी राखण्याच्या, तशीच ती उबवण्याच्या कामातही शहामृगीला शहामृग मदत करतो. पती-पत्नीतला हा श्रमसहकार कौतुकास्पद नाही असे कोण म्हणेल !

शहामृगाची पचनशक्तीही मोठी जबर असते. जे मिळेल ते ते स्वाहा करण्याची त्याची तयारी असते. मग गवत–पाला असो की दाणेदुणे असोत. फळे असोत की किडामुंगी असो. शहामृगाला वर्ज्य असे काहीच नाही. हाडकाचे तुकडे आणि दगडही तो गिळू शकतो असे म्हणतात. शहामृगाच्या जिभेच्या मुळाशी एक छोटीशी मांसल पिशवी असते. आपले खाणे खातानाच शहामृग ही पिशवी भरून घेतो. पिशवी भरली की मग तो थोडा वेळ खाणे थांबवतो. आपली निमूळती लांब मान वर करतो आणि पिशवीत भरलेले

खाणे सावकाशीने हळूहळू गळ्याखाली उतरवतो. पिशवी रिकामी झाली की पुन्हा ती तो भरून घेतो. अशा प्रकारे शहामृगाचे जेवण चालते.

शहामृगाचे शरीर मोठे, अंडे मोठे; तसाच त्याचा आवाजही मोठाच. मोठा आणि भीतिदायक.

आफ्रिका आणि पश्चिम अशियातील वाळवंटी प्रदेशांत शहामृगांची वस्ती विशेष आहे. भारतात सर्वत्र आढळणारा हा पक्षी नव्हे. तरीसुद्धा शेंडीफोड्या 'श' मुळे तो सर्वपरिचित बनला आहे.

# बहिरी ससाणा

एकदा एक होला पक्षी बहिरी ससाण्याच्या तावडीत साप-डला. ससाण्याने झेप घेतली, पण होल्यानेही आपला जीव गोळा करून सारे सामर्थ्य पणाला लावले आणि ससाण्याच्या झेपेतूनही तो निसटला. जीव घेऊन उडाला. उडाला तो शिबी राजाच्या पुढ्यात येऊन बसला. ससाण्याला हुलकावणी देऊन आला खरा, पण ससाण्याचा दुष्ट स्वभाव त्याला चांगलाच ठाऊक होता. ससाणा काही असा तसा आपल्याला सोडणार नाही याची त्याला पक्कीच खात्री असावी. आणि म्हणून तर जिवाच्या भीतीने भेदर-लेला होला पुढ्यात येऊन बसलेला पाहून दयाळू शिबी राजाने त्याला उचलून कुशीत घेतले. अंगावरून अलगद हात फिरवून त्या घाबरलेल्या जिवाला अभय दिले.

तेवढ्यात बहिरी ससाणाही शिबी राजापुढे दत्त म्हणून हजर झाला. म्हणू लागला,

" माझी शिकार मला दे. "

" कशी देऊ ? हा तर माझ्या आश्रयाला आहे. मी याला अभय दिले आहे. "राजा म्हणाला,

" वा वा! असे कसे? माझे भक्ष्य तू हिरावलेस तर मी खाऊ काय ? हा काय न्याय झाला ?" ससाणा तावातावाने म्हणाला.

" पण जीवभयाने आश्रयाला आलेल्या पक्ष्याला मरणाच्या तोंडी देणं हा तरी न्याय कसा होईल ?" राजा म्हणाला.

" व्यर्थ वाद घालायला मला मुळीच वेळ नाही. माझा होला

मला दे. भुकेनं जीव व्याकुळ झालाय माझा."

"होला मी देणार नाही. पण तुझी भूक मात्र शमवीन."

"ती कशी काय?"

"होल्याच्या वजनाइतकं मास माझ्या शरीरातून देतो. मग तर झालं?"

आणि असे म्हणून राजाने खरोखरीच एक धारदार सुरी घेतली. तराजूच्या एका पारड्यात होल्याला ठेवलं आणि सुरीनं स्वतःच्या शरीरातील मासाचा लचका, एखादं फळ कापावं तशा सहजपणानं कापून, तराजूच्या दुसऱ्या पारड्यात ठेवला. धन्य तो शिबी राजा! आणि धन्य त्याची उदारता!

केव्हा तरी, लहानपणीच, ही शिबी राजाची गोष्ट वाचली नि त्याच वेळी राजाच्या मोठेपणाची, भलाईची आणि ससाण्याच्या दुष्टाव्याची छाप मनावर उमटून गेली. ससाण्याच्या दुष्टपणाची केवळ छापच नव्हे, तर एक प्रकारची भीतीही मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी साचून राहिली.

अशी भीती किंवा दवदवा वाटावा असाच हा राकट, दणकट नि चिकट पक्षी आहे. शिकारी पक्ष्यांतला हा एक चतुर शिकारी! एकदा सावज टिपलं रे टिपलं की सहमा तावडीतून सुटायचं नाही! अशी स्वारीची ख्याती आहे, म्हणूनच तर काही शिकारी ससाण्याला पाळतात आणि शिकारीचं खास शिक्षणही देतात. शिकारी कुत्रे कसे तयार केलेले असतात, तसेच शिकारी बहिरी ससाणेही असतात! त्यांना 'हंटिंग हॉक' असेच म्हणतात.

मीर शिकारी याची खास देखभाल ठेवतात. शिकारीला नेताना ससाण्याच्या तीक्ष्ण डोळ्यांवर कातड्याची ढापणे लाव-

तात. हेतू असा की, नेमलेल्या शिकारीवरच याने पाळत ठेवावी नि त्याचाच पाठलाग करावा. नाही तर जाता जाता दिसेल त्यावर झडप घालून डल्ला मारण्याची खोड फार !

आकाराने घारीपेक्षा थोडा मोठा असलेला हा पक्षी रंगाने राखी, तपकिरी पंखांचा नि पांढऱ्या-तपकिरी डोक्याचा दिसतो. याचे पोट नि चोचीखालचा भागही पांढुरकाच असतो. या पांढऱ्या भागावरही काळपट तपकिरी रंगाच्या खवल्या अधून मधून असतात. गाल आणि चोच काळ्या वर्णाची, तसेच पाय आणि नख्या देखील. नख्या एवढ्या तीक्ष्ण की भक्ष्याचे शरीर छिन्न-भिन्न करतीलच करतील; पण पाळणाऱ्या मीर शिकाऱ्यालाही स्वतःच्या हातात चामड्याचे हातमोजे घातल्याशिवाय स्वारीला



हातावर घेणे धोक्याचे असते !

ससाण्यांचे निवासस्थान असते बहुधा पाणथळ ठिकाणांच्या जवळ. नदी, नाले, तळी, सरोवरे अशा ठिकाणी. म्हणजे मग काठावरच्या उंच झाडाच्या शेंड्यावर किंवा डोंगराच्या माथ्यावर टपून बसता येते. खालच्या पाण्याच्या प्रवाहाकडे असे टक लावून बसले असतानाच एखादा गाफील मासा पाण्याच्या पृष्ठभागाजवळ उसळी मारताना किंवा संथ तरंगताना दिसतो. तो असतो आपल्या नादात; पण दबा धरून बसलेल्या ससाण्याचे साधते. तो झपकन सूर मारतो आणि गाफील मासा चोचीच्या चिमटीत अलगद धरून परत उड्डाण घेतो.

आणि समजा, जर एखादा मासा एखादे वेळी तेवढा गाफील नसेल तर त्याला ससाण्याच्या पंखांच्या झपाट्याची चाहूल लागते आणि तो सुळकन तळाशी बुडी मारू लागतो. पण ससाणाही काही कमी वस्ताद नसतो. तोही आपले पसरलेले पंख छत्रीसारखे मिटून घेतो नि सरळ पाण्यात सूर मारतो ! त्याचे पंखही 'वॉटर प्रुफ' असल्यासारखे असतात.

आंघोळीच्या वेळीही असाच सूर मारून तो शरीर भिजवतो नि मग टेकडीवरच्या उन्हात बसून आरामाने सुकवतो.

माशाप्रमाणेच बेडूक, साप, होला, लावा, चितुर आदी प्राणी ससाणा मटकावतो.

ससाण्यातही सागरी ससाणा म्हणून अेक जात आहे. ही स्वारी म्हणजे चाचेगिरी करण्यात पटाईत ! स्वत:ला झेपणार नाही एवढा अवाढव्य मासाही झडप घालून, नख्या रुतवून पकडणार. कसाबसा जवळच्या खडकावर नेणार आणि मग बारीक

बारीक खांडोळी करून पळवणार. कधी कधी हा डाव अंगाशीही येतो. भला भक्कम मासा दाद देत नाही. तोच ससाण्याला ओढून समुद्राच्या तळाशी नेतो! या धंद्यावरून याला ‘मच्छीमार’ही म्हणतात.

घार, गरुड आणि गिधाड यांच्याप्रमाणेच नर-मादी मिळून उंचावर घरटे बांधतात. मादी एकदम अंडी न घालता अंतरा-अंतराने घालते. पिलांवर, घरावर दोघांचाही जीव असतो. आपल्याप्रमाणेच आपल्या बच्चे मंडळींनाही ती दोघे शिक्षण देऊन तयार करत असतात, जगायला लायक बनवत असतात!

# पावशा

उग्र उन्हाळा संपलेला असतो. मृगाचे आगमन झालेले असते. नांगरून पडलेली धरणी आभाळाकडे डोळे लावून असते. मग एके दिवशी आभाळही दयार्द्र बनते. त्याचा नूर पार पालटून जातो. दिशा पाणावतात. विजा कडाडू लागतात. थंड, उन्मादक वारे वाहायला लागतात आणि वाजत गाजत पावसाचे धारानृत्य सुरू होते. धो–धो–धो पाऊस कोसळतो. पशू-पक्षी, माणसेसुद्धा निवाऱ्याला जातात. सगळे चिडीचिप होतात. पण एक पर्जन्यवेडा मात्र इतक्या दिवसांची अळीमिळी सोडून घरट्यातून बाहेर पडतो. ओल्याचिंब जमिनीवर भिरभिर घिरट्या घालतो. खालून वर, वरून खाली फीर फीर फिरत राहातो. विजांच्या लखलखाटात आणि मेघांच्या गडगडाटात त्याच्या मौनाला स्वरांचे धुमारे फुटतात. कवी अनिलांनी ते शब्दबद्ध केले आहेत :

" भिऊ भिऊ भिऊ
नका भिऊ भिऊ
उठा रे उठा रे सत्वर सत्वर
तत्पर तत्पर
पेरा पेरा पेरा
नवी बीजे पेरा
नव्या आशा धरा
पेर्ते व्हा ! पेर्ते व्हा ! "

पावशा पक्षी पेऱ्याची पर्वणी साधण्याची ललकारी देत उडू लागतो :

"पाऊऽस आलाऽ—पाऊऽस आलाऽ!
पाऊऽस आलाऽ— पाऊऽस आलाऽ! "

पावशाची 'पाऊस आला' ही ललकारी ऐकली म्हणजे 'ये रे ये रे पावसा' म्हणून आनंदाने नाचणाऱ्या वयाची आठवण होते. ते स्वत:भोवतीच गरगर फिरणे, फिरता फिरता गाणे म्हणणे, म्हणता म्हणता भोवळून धप्प्कन खाली पडणे... गंमतच गंमत!

पावशा पक्षी मृगाची चाहूल लागली रे लागली की असे मूल बनून जातो. भिर भिर भिर फिरतो. 'पाऊऽस आला— पाऊऽस आला' असे पावसाचे गाणे म्हणत सुटतो, अगदी तन्मय होऊन.

तसा पावशा हा पक्षी एरवी मोठा गंभीर. एखाद्या तपस्व्या-प्रमाणे समाधी लावून बसणारा, तत्त्वज्ञ्याप्रमाणे कुणाशी फारसे न बोलणारा. आपल्यातच बुडून जाणारा. स्वत:तच मग्न होणारा.

थंडीत तर विचारूच नका. कार्तिकातली साखर थंडी पडू लागली की पावशाचे मौनव्रत सुरू होते. जणू कुणी तरी त्याला सांगते,

"बोलू नक्का— हसू नक्का
नाही तर द्यावा लागेल टक्का! "

पावशा आपला मिठाची गुळणी धरून गप्पगार होतो. हु नाही टू नाही. खुट्ट नाही. फुट्ट नाही. चिडीचिप!

आणि अशी थंडी जाते; असाच उन्हाळाही संपतो. मग येतो भन्नाट वारा. पाठोपाठ येतात काळे कुट्ट ढग. पाण्याने गच्च

भरलेल्या पखालीसारखे आणि बस्. पावशाचे मौनव्रत संपते. तो चोच उघडून ओरडतो. तेच ' पाऊ ऽस आला, ' ' पाऊ ऽ स आला ! ...'

आणि एकदा–दोनदा नव्हे. चांगले सात–आठ वेळा. वरचेवर लागोपाठ. चढत्या स्वराने, आणि त्या चढत्या स्वरातच पटकन थांवतो. गप्प होतो. थोडा वेळ असा जातो, मग पुन्हा तीच उजळणी होते. पुन्हा होते. पावसाळ्याच्या दिवसात ही उजळणी अशी दिवसभर तर सुरू राहतेच राहते; पण रात्री चांदण्यातही हा पाऊसखुळा ओरडत, भिरभिरत राहतो.

पावशाच्या ओरडण्यातून मराठी माणसाला ' पाऊ ऽ ऽ स आला ऽ ' किंवा ' पेर्ते ऽ ऽ व्हा ऽ ! ' असे शब्द ऐकू येतात, हिंदी



भाषिक माणसाला, 'पी– कहाँ ऽऽ!' 'पी कहाँ ? ऽऽ' असा प्रेमार्त प्रश्न ऐकू येतो. मराठी माणसाला पावशा हा नव-जीवनाचा संदेश देणारा दूत वाटतो; तर हिंदी भाषिकाला तो 'प्रेम कुठाय ?' असा टाहो फोडणारा प्रेमशोधक वाटतो. ते याला 'पपीहा' किंवा 'पपीया'च म्हणतात.

पण यापेक्षा गंमत आहे इंग्रज माणसाची. त्याला त्याच्या ओरडण्यातून ऐकू येते ते, 'ब्रेन-फीवर' 'ब्रेन-फीवर'. तो पावशाला 'ब्रेन-फीवर बर्ड' असे म्हणतोदेखील चक्क. असा हा अनेकांना अनेक काही भासवणारा, ऐकवणारा पावशा असतो तरी केवढा ? तर असतो आपल्या कबुतराएवढा गुबगुबीत अंगाचा. मात्र लांवलचक शेपटीचा. राखी करड्या रंगाचा कोट पाठीवर असतो, तर पोट पांढुरक्या सदऱ्याने झाकलेले असते. कोटावर आणि सदऱ्यावर तांबूस–काळपट रंगाचे चट्ट्यांसारखे ठिपके असतात. शेपटीवर ते अधिक गडद व मोठे दिसतात. पावशा आणि पावशीणबाई दिसायला सारखेच दिसतात. पावशीणबाई-च्या संदर्भात बोलताना कोट–सदऱ्याऐवजी साडी–चोळी म्हटलं म्हणजे पुरे !

पावशा वरवर दिसायलासुद्धा एखाद्या लढवय्या पक्ष्या-सारखाच दिसतो आणि तसा तो असतोही. आपल्या शत्रूशी तो जोराने झुंज देतो. त्याची भरारीही तशीच वेगवान. हालचालही तशीच चपळ आणि जलद.

पावशा राहतो झाडा–झुडपात. आंब्यासारख्या झाडांवर. घनदाट जंगलात त्याला भीती वाटते की काय कुणास ठाऊक !

मनुष्यवस्तीजवळच्या रानात, उद्यानात त्याचा मुक्काम असतो. कीड-मुंगी, सुरवंट, आळी, बोर, उंबर, जांभूळ, अंजीर

वेचून टिपून खातो.

घरबांधणीचा पावशाला कंटाळा फार. म्हणून मग इत-रांनी बांधलेल्या घरातच घुसण्याचा आणि तळ ठोकून राहण्याचा उद्योग करावा लागतो. आयत्या विळात नागोबा !

खरे म्हणजे एवढाही उद्योग केलाच नसता. पण उन्हाळ्या-च्या दिवसात पावशीणबाई अंडी घालतात आणि मग बाळबाळं-तिणीची सोय करणे भाग पडते. पावशेराव कुरकुरत असतील, पण करणार काय ?

जून महिना उजाडतो. आषाढ–मेघ जमू लागतात; आणि सातआठ महिने मूग गिळून बसलेल्या ह्या पाखराच्या पंखात वेगळाच जोश संचारतो. कंठ मोकळा होतो. आनंदाच्या भरात सगळ्या जगाला सांगत सुटतो–

" पाऊऽऽस आलाऽ
पेर्तेऽऽ व्हाऽ !
पाऊऽऽस आलाऽ
पेर्तेऽऽ व्हा ! "

# भारद्वाज

“ भारद्वाजा विहगा माझ्या
धन्य जगी तू मज गमसी ।
फुलल्या बागा या तरुरांगा
त्यावरती भरभर फिरसी ।।
भारद्वाजा विहगा माझ्या
तू वनराजा खरोखरी
हिरवा मांडव सृष्टिदेवता
तुजसाठी हा काय करी ।।

बालकवींनी भारद्वाजाला ‘ विहगा माझ्या ’ म्हटले आहे. सृष्टीची गाणी गाणारा, निसर्गाची कोडी उकलणारा आणि सौंदर्याचा विलक्षण सोस असलेला बालकवीसारखा ‘आनंदयात्री’ कवी नाही. आणि अशा आनंदयात्रीने ‘ विहगा माझ्या ’ म्हणावे हे भारद्वाजाचे भाग्य की त्याच्या गुणांचे कौतुक ?

गुणांचे मुद्दामच म्हटले. कारण रूपरंगाने काही स्वारी तशी देखणी नाही. सुंदर, आकर्षक नाही. पोपटाचा हिरवा कोट नाही की कोंबड्याचा लालभडक तुरेबाज फेटा नाही. राजहंसाची गोरी-पान कांती नाही, की मोराचा रंगीबेरंगी पिसारा नाही. . . आहे आपला कावळेकाकांचा वर्ण ! कोकिळासारखा म्हणा हवे तर ! आकार-प्रकार कावळ्यासारखाच. तेवढाच आणि तसाच. मात्र शेपटी पल्लेदार ! कावळ्याच्या मानाने अंमळ लांबसर आणि



डौलदारसुद्धा. लांब शेपटीत सौंदर्य असेल तर ते भारद्वाजाजवळ निश्चित आहे. आणखी किंचित फरक असा की भारद्वाजाच्या काळ्या पंखांवरही उदी रंगाची छटा दिसते. डोळे देखील तांबूस वर्णाचे असतात.

का कुणास ठाऊक, पण भारद्वाजाला पोपटाप्रमाणेच छानदार पिंजऱ्यात ठेवून दारी पाळण्याचा षोक लोकात आहे. ह्या पाळीव पक्ष्याचा आवाज मधूर आहे. तो 'कुक्कुट कुक्कुट' असा ध्वनी काढतो. त्यावरूनच त्याला कुणी कुणी 'कुक्कुट कुंभा' या नावाने ओळखतात.

"नवरदेव सोनेरी रविकर–नवरी ही फुलराणी सुंदर" अशा या अपूर्व लग्न सोहाळ्यातही बालकवींनी आपल्या लाडक्या विहगाची हजेरी लावलेली आहे. निसर्गातली निरनिराळी मंडळी या सोहाळ्यात आपापल्या परीनी झटून कामे करत होती.

"गाउ लागले मंगल पाठ–
सृष्टीचे गाणारे भाट
वाजवि सनई मारुतराणा–
कोकिळ घे तानांवर ताना !
नाचु लागले भारद्वाज–
वाजविती निर्झर पखवाज"

तर भारद्वाज हे नाचणारं पाखरू आहे. आणि म्हणूनच कदाचित मोरासारखा भला मोठा पिसारा नाही तर नाही, पण निदान लांबसडक शेपटी तरी असावी, म्हणून ती त्याला लाभली असावी !

हे नाचणारं पाखरू शुभ मानतात. घुबड, वटवाघुळाचं नाव घेताच 'शिव शिव' म्हणून कानांवर हात ठेवणारी मंडळी भारद्वाजाचं दर्शन प्रिय समजतात. इतकंच नाही तर चुकून माकून अंगणातल्या झाडावर भारद्वाज बसलेला दिसला तर ही श्रद्धाळू माणसं चटकन् जातील नि त्या झाडाला तीन प्रदक्षिणा घालतील! त्यांचा चेहेरा फुलून जाईल. डोळ्यात समाधान तरळेल. त्यांना कसं प्रसन्न, कृतार्थ वाटेल. खरं माना, खोटं माना, विश्वास ठेवा अगर ठेवू नका , पण या श्रद्धाळू माणसांची अशी एक श्रद्धा आहे की, भारद्वाज पक्ष्याला तीन प्रदक्षिणा घातल्या म्हणजे काशीयात्रेचं पुण्य मिळतं ! गाईची शेपटी डोळ्याला लावली म्हणजे सगळी

पापं झडून जातात अशी जशी एक समजूत, तशीच ही देखील एक समजूत. या समजुतीला या पाखराचं नावच कदाचित कारणी ठरलं असेल! 'भारद्वाज' ऋषीचं केवळ गोत्रच नव्हे तर खुद्द नावच सांगणारं हे पाखरू आहे! त्या श्रेष्ठ तपस्व्याची पुण्याई याच्या नावावर जमा झाली की काय कोण जाणे!

श्रद्धाळू माणसांची गोष्ट सोडा, पण लोकप्रिय पक्ष्यांत भारद्वाजाची गणना होते, हे खरेच. भारद्वाज पती-पत्नी म्हणजे मोठे प्रेमळ जोडपे. पाला पाचोळयाचे घरटे बांधतात. सुखासमाधानाने संसार करतात. बाई चार-सहा अंडी घालतात. बुवा इमानानं राखण करतात. चिल्यापिल्यांना कीडमुंगीचा रतीब लावतात. पंखात बळ येईतो देखभाल करतात. उडण्याचं, भक्ष्य मिळवण्याचं आणि आत्मरक्षणाचं शिक्षण देतात. माता–पिता म्हणून आपलं कर्तव्य चोख बजावतात. पतीपत्नी म्हणून एकनिष्ठ राहतात. कुठे जायचे-यायचे झाले तर जोडीने जातील, जोडीने येतील. शेजाऱ्या-पाजाऱ्यांचा किंवा भाऊबंदांचा गोतावळा जमा करणार नाहीत. आपण बरे, आपले घर बरे, अशी अल्पसंतुष्ट वृत्ती. स्वतःपुरतीच दृष्टी.

आनंद झाला, रंगात आले तर एकमेकांभोवती नाचतील. 'कुक्कुट कुक्कुट' असा ध्वनी काढतील. एकमेकांच्या पिसांत चोच खुपसतील, मान घासतील! तृप्त होतील!

# पिंगळा

पिंगळा म्हटल्याबरोबर एक लहानपणची आठवण मला अगदी हटकून येते. माझं लहानपण माझ्या गावी गेलं. गाव होतं—धड लहानसं खेडं ना मोठं शहर—असं तालुक्याचं. मध्यम वस्तीचं. तर तिथं पहाटेच्या साखरझोपेच्या वेळेला एक प्रकारचा गमतीदार कुडमुडयाचा आवाज काढत कोणी एक माणूस यायचा.
तोंडाने काही काही म्हणायचा. काय म्हणायचा हे त्या वेळी कळले नाही. आज आठवतही नाही. पण त्याच्या म्हणण्याला एक सुरेख लय असायची. आणि म्हणणे संपले की तो जे कुडमुडे वाजवायचा त्याला तर विलक्षणच गती आणि लय असायची. ती चढत्या गतीने चढत जायची आणि एकदम संपायची. संपताच माणसाचे बोलणे सुरू व्हायचे. बोलणे संपले की कुडमुडे वाजायचे. असे आळीपाळीने तुकडयातुकडयाने चालायचे. पण पहाटेच्या शांत, गार वेळेला ते झोपेत ऐकताना झकास वाटायचे.

मला कळले की, त्या माणसाला पिंगळा म्हणतात. पिंगळा नावाच्या पक्ष्याची वाणी या माणसाला म्हणे कळते. ती भविष्यवाणी असते. त्या पिंगळयाची भविष्यवाणी हा पिंगळा माणसांना प्रात:काळी सांगत हिंडतो. खरं खोटं माहीत नाही. पण पिंगळा हा देखील बहुरूपी, वासुदेव, गुरूवाळ संतोष, नंदीबैल या याचकांपैकीच एक याचक आहे.

संत नामदेवांनी आपल्या एका रचनेत या पिंगळयाचा उल्लेख केलेला आहे.



पिंगळा बोले महाद्वारी।
निशा सरली दिशाचारी।
उठा उठा हो श्रीहरी।
उदयो प्रकाश दिनकरी।
देवा शकुन ऐकावा ।।

शकुनाचा आणि पिंगळ्याचा असा दृढ संबंध आहे. पिंगळ्याचा शकुन मला कधी कळला नाही. पण पिंगळा मात्र खरोखर एकदा दिसला. एका जुनाट विहिरीच्या खवदाडीत, वटवटीत डोळ्यांचा आणि मैनेच्या आकाराचा. तसं पाहिलं तर घुवडासारखाच जवळजवळ. घुवडाचे डोळे असेच वटवटीत वाटोळे, आणि पुढे असतात. माणसांच्या डोळ्यांत आणि घुवड पिंगळ्यांच्या डोळ्यांत खूपच साम्य दिसते. माणसाला जसे आपले डोळे इकडे तिकडे फिरवता येतात तसेच घुवड-पिंगळ्यांनाही येतात. पक्ष्यांचे डोळे सामान्यत: दोन्ही बाजूंना असतात. पण घुवड–पिंगळ्यांना समोर असतात. ते विलक्षण भेदक आणि तेजस्वी दिसतात. पाहताच भय वाटावे असे असतात. पिंगळा हा घुवडाच्याच जातीचा पक्षी आहे. घुबड आकाराने मोठे असते, तर पिंगळा हा छोटा असतो. घुवडाला इंग्रजीत Owl म्हणतात, तर पिंगळ्याला Spotted Owl असेच म्हणतात.

पिंगळ्याच्या करड्या-तपकिरी रंगाच्या केसाळ अंगावर पांढरे-पांढरे ठिपके असतात. डोळे गरगरीत गोल असतात. तसेच त्याचे डोकेदेखील वाटोळे असते. नर-मादी सारखेच दिसतात.

ओसाडीत, ढोलीत, खबदाडीत घुवडाप्रमाणेच पिंगळाही वस्ती करून असतो. भारतात सर्वत्र पिंगळा आढळतो. ब्रह्मदेश आणि पाकिस्तानातही दिसतो. परंतु श्रीलंकेमध्ये याची वस्ती नाही. हवामानाप्रमाणे यांच्या आकारात आणि रंगात फरक आढळतो. या फरकामुळे पिंगळ्याच्याही तीन जाती दिसतात.

पिंगळाही सहसा दिवसा-उजेडी बाहेर पडत नाही. घुबडा-सारखाच तोही निशाचर आहे. रात्र झाली, अंधार पडला म्हणजे पिंगळ्याचे उजाडते. अंधेऱ्या रात्री तो भिरभिरत राहतो. आपले भक्ष्य शोधतो. पतंग, सरडे, किडे, मुंगी, उंदीर, घुशी हे पिंगळ्याचे खाद्य. याचा झपाटा असा की, एखादा लहानगा प्राणी दिसला रे दिसला की झडप घालून पिंगळा तो पकडतो आणि सरळ गट्टम करून टाकतो. नंतर मात्र स्वस्थपणानं जनावरं रवंथ करत बसतात त्याप्रमाणं आतल्या आतच त्या प्राण्याचे मास खाऊन त्याची चामडी, केस, टणक हाडं यांच्या लगद्याच्या लहान लहान गोळ्या बाहेर थुंकत राहतो. त्याची चोच चिटु-कली आकडेदार असते. पिंगळा राहतोही मनुष्यवस्तीच्या जवळ. आसपास घनदाट जंगल त्याला आवडत नाही.

क्वचित मादीसह पिंगळा दिवसाही बाहेर पडतो. पिंगळा उडतो झपाट्यानं. त्याचे पंख तसे आखूड असतात. तो फार उंच मात्र जात नाही. त्याचे टवकारून पाहणे मोठे विचित्र दिसते.

पिंगळ्याचे ओरडणे कर्कश वाटते. किलिवल किलिवल

असा ध्वनी तो करतो. मात्र आपल्या भाषेत अस्खलित वाक्प्रवाह सुरू करण्याची याला चमत्कारिक सवय आहे. याची लहान लहान पिल्लंही अशीच बोलत असतात. आवाज करत राहतात.

पिंगळीणबाई अंडी घालण्याचं काम करतात. या कामासाठी त्या नोव्हेम्बर ते एप्रिल हा कालावधी पसंत करतात. वर्षातून या वेळी त्या फक्त तीन ते चार अंडी घालतात. अंडी लहान, वाटोळी आणि पांढऱ्या रंगाची असतात. अंडी घालण्यासाठी पिंगळीणबाई पालापाचोळा, गवतकाड्या, झाडाच्या खोवणी, जुनाट वाड्याच्या, देवळांच्या भिंतींमधील फटी, छपरामधील पोकळी अशा निवाऱ्याच्या जागा शोधतात. आपली अंडी घालतात. उबवतात. पिलांचे पालन-पोषण करतात. या घरगुती कामात पिंगळेरावही पिंगळीणबाईंना मदत करत असतात. दोघे मिळून गृहखाते चालवतात; हे खरे असले तरी दोघांनाही घर बांधायचा कंटाळा भरपूर आहे. त्या काटक्या-कुटक्या जमवायच्या; नीटनेटक्या रचायच्या, केस, पिसं गोळा करायची, अंथरायची; शिवणं, विणणं, टिपणं ही दगदग पिंगळ्याच्या जोडीला बिलकुल आवडत नाही. सोसवत नाही. एखाद्याला घर हवं असतं रहायला. निवाऱ्याला. पिलांची काळजी घ्यायला. पण ते बांधायची कटकट मात्र त्यांना मानवत नाही. घर पहावं बांधून असं म्हणतात ते या कटकटीला, दगदगीला अनुलक्षूनच. म्हणून पिंगळा या भानगडीत पडतच नाही. घर बांधून पाहातच नाही, तर सांदी कोपरा, वळचण, बिळं ही आपली आयती घरं तो पसंत करतो. बळकावतो.

आणखी एका जातीचा जो पिंगळा असतो तो बहुधा जंग-

ल्यात आढळतो. त्याला जंगली पिंगळाच म्हणतात. हा जंगली पिंगळा आकारमानाने आपल्या गावठी पिंगळ्याएवढाच साधारण असतो. मात्र गडद तपकिरी वर्णाच्या अंगावर आडवे, लहान-लहान, पण ठळक पट्टे असतात. गावठी पिंगळ्याच्या अंगावर पांढरे ठिपके तर त्याच्या अंगावर काळपट तपकिरी रंगाचे पट्टे असतात.

फरचा ओव्हर कोट घातल्यासारखे केसाळ पिसांनी पिंगळ्याचे शरीर नखशिखान्त झाकलेले दिसते. याच्या माथ्यावर आणि पायांवरही मऊसूद केस असतात. त्यामुळे दुसऱ्याची चाहूल सावधपणे टिपणाऱ्या पिंगळ्याची चाहूल इतरांना मात्र लागत नाही. इतर पक्ष्यांच्या घरट्यांवर हल्ला करून त्यांची पिलं पळवायला हे केसाळ पाय पिंगळ्याला मदतच करत असतात. पोटाकडचा आणि पायावरचा भाग पाठीसारखा तांबूस-तपकिरी नसतो. तो पांढुरका दिसतो. डोळ्यांवरच्या भिवया आणि चोचीखालच्या मिशादेखील पांढऱ्या पांढऱ्या दिसतात. पिंगळ्याची मान वसकी, लहान असते. त्याला अिकडे तिकडे पाहताना डोकेच वळवावे लागते.

पिंगळा, घुबड या पक्ष्यांना आपल्याकडे अभद्र आणि अशुभ मानलेले असले तरी पाश्चिमात्य त्याला वाइज बर्ड– शहाणा पक्षी– मानतात.

घुबड मूळचा आहे जोशी ।
हाक मारली त्याने टिटवीशी ।
बरोबरी घेऊन पिंगळ्याशी ।
जोडी झाली तिघांची ।
घुमायला दादा ।।


तर असा हा पिंगळा शकून सांगणारा, टक लावून बघणारा.

# सारस

पुण्याच्या तुळशीबागेत जसे तुळशीचे वाफे नाहीत, तसेच सारस बागेत देखील सारस नाहीत. नव्यानेच केलेली बाग सरस आहे, पण अद्याप सारस पक्षी दिसत नाही. मात्र जुन्या स्त्रियांच्या ओवीतली एक ओवी आठवते–

“ तुळशीच्या अगणात
बंधु सावळे ग उभे
सारसांची जोडी शोभे मनोहर ! ”

सावळ्या रंगाच्या उभ्या बंधूंना सारस जोडीची उपमा देण्यात काव्य आणि औचित्य साधलेले आहे यात शंका नाही. कारण सारस पक्षीगणातला असला तरी तो चिमणी-पारव्यासारखा मूठभर नाही. उभा ठाकला म्हणजे सहज पाच फूट भरेल, इतकी त्याची उंची असते. वर्णही शुभ्र पांढरा नसतो. पांढुरकाच असतो. आणि लाल वर्णाचे मोजे घातल्यासारखे दिसणारे पाय, त्याच वर्णाचा डोक्यावरून गळ्याभोवती गुंडाळलेला गळपट्टा, पिवळसर पण लांबसर चोच. डौलदार मानेचा बाक–एकूण ध्यान दिसायला खरोखरच मनोहर ! सारसांची संसार-जोडीही मोठी प्रेमळ. जिवास जीव देणारे हे दांपत्य प्रपंचही तसा नेटका करत असते. पावसाळ्यापासून हिवाळ्यापर्यंत घर-बांधणी, शाकारणी चालते. गवत, पाचोळा, काटक्या-कुटक्या असला मालमसाला दोघे मिळून गोळा करतात. झाडाच्या बेचक्यात किंवा भाताच्या खाचरात ठेंगणे ठुसके घर उभारतात. पाणथळ जागी नदी-नाल्या-



च्या काठीच परस्परांची जोडी बहुधा आढळते. पाण्याच्या सान्नि-ध्यात राहणारा सारस पक्षी तसा पोहण्यात वा सूर मारण्यातही पटाईत नाही. काठावरच्या उथळ पाण्यात बगळ्याप्रमाणे एका पायावर उभे राहून शिकार करण्याची व झोप घेण्याची सवय सारस पक्ष्यालाही आहे. परस्परांतील प्रेमामुळे नर-मादीला एकेकटे राहण्यात चैन पडत नसावे. म्हणूनच की काय बहुधा सारसांची जोडीच आढळते. कधी कधी तर हे कुटुंब सहपरिवारही दिसते. प्रेम, वात्सल्य, कौटुंबिक जिव्हाळा, सारस मंडळीत विशेष असतो. या जिव्हाळ्यामुळे कुटुंबीय मंडळीचे पालन पोषण उत्तम होतेच, पण एकमेकांना संरक्षणही लाभते. संरक्षणाची हमी ही फार मोठी

गरज आहे. माणसांची तशी पक्ष्यांची. देखील कुटुंब-भावनेतून अशी हमी थोडीफार मिळू शकते.

सारस मादी ही दक्ष गृहिणी असते. आपल्या घराकडे आणि पिटुकल्यांकडे तिचे सदैव लक्ष असते. वर्षभरात ती फक्त दोनच अंडी घालते. फिकट पोपटी रंगाची किंवा क्वचित् गुलाबी छटा असलेल्या अंड्यांवर तिची देखभाल असतेच, पण सारस नर देखील घरटच्यावाहेर पहारा देत राहतो. अंडी-चोर पक्ष्यांवर लक्ष ठेवतो. एखादा लुटारू तडाख्यात सापडलाच तर त्याच्यावर हा हल्ला चढवतो. मादीही अशा वेळी ह्याच्या मदतीला धावून येते. एरवी शांत, भोळी दिसणारी ही सुंदर जोडी अशा प्रसंगी भयंकर उग्र स्वरूप धारण करते. हिंसक बनते आणि लुटारू पक्ष्यांवर चोचींचा आणि लांब छडीसारख्या तंगड्यांचा मारा करून त्याला घायाळ करतात. पळवून लावतात.

नर-मादी दोघेही आपल्या पिटुकल्यांसाठी कीड, मुंगी, आळी, जळमट, दाणादुणा, भाजीपाला गोळा करून आणतात. मादी निवडून टिपून पिलांना भरवते. कठीण कवच किंवा मोठाली हाडके ती पिलांना देत नाही. कारण ते पदार्थ पचायला जड असतात. पिटकल्यांच्या आतड्याला त्यापासून त्रास होईल हे त्या माउलीला कळते. मग ती काय करते ? तर लुसलुशीत मासाचे लहान लहान गोळे पिटुकल्यांना चारते. आपली आई नाही का आपल्याला लहानपणी गुरगुट्या भात भरवत !

लहानपणी क्षीण आवाजात चिवचिव करणारी ही पिले मोठेपणी मात्र खणखणीत तुतारीसारखा लांववर पोचणारा ध्वनी काढतात. पंखांचे पंखे हालवत नाचतात, मुरडतात.

## आभाळ मित्र

निळ्याभोर आभाळातून पांढरी शुभ्र बाकदार मान पुढे काढून आणि पाय मागे सारून उडणारा सारस पक्षी शोभिवंत दिसतो. त्याचे गोजिरवाणे पंख उडायलाही भक्कम असतात. त्यांची पिसे देखील दर वर्षी न गळता दोन वर्षांतून एकदा झडतात. पिसे झडली म्हणजे देखण्या सारसाला आपल्या ओंगळवाणेपणाची भारीच लाज वाटू लागते. अशा वेळी चार-चौघांत येण्याचे तो टाळतो आणि नवी पिसे अंगावर फुटेतोवर सांदीकोपऱ्याला दडून राहतो. नव्या पिसांचा कोट घालून मग पुन्हा लंबूटांग्या सारस नदीच्या काठाकाठाने हिंडू फिरू लागतो. उंच काटकुळे पाय हे सारसाचे अन्य पक्ष्यांहून वेगळे असे वैशिष्ट्यच. बालपणी हे पाय दररोज पाव इंचांनी वाढत असतात म्हणे !


सारस आनंदाने गातो. गातो कसचा ओरडतोच; आणि नाचतोही; पण गाण्यावरून कोकिळाशी आणि नाचण्यावरून मोराशी तुलना मात्र करू नये हे बरे! मोराचे नाचणे हे मोरानेच नाचावे! 'आमुच्या नाचणी नाचू नका' असेच मोर दिमाखाने इतरांना सांगेल आणि हा दिमाख, तोरा, मोराला शोभूनही दिसतो. तर सारस नाचतो म्हणजे सारसासारखाच नाचतो. आपल्या मनाची खुषी व्यक्त करतो. प्रियेला रिझवतो. पोरांना खेळवतो. खेळावरून आठवण झाली. सारसाचे खेळ मोठे गमतीचे असतात. पैकी एक खेळ असा : जमिनीवरचे लहान मोठे शाळिग्रामासारखे गोटे जमा करावयाचे, ते मातीच्या ढिगाऱ्यावर किंवा टेकडीवर न्यायचे आणि त्या उंचीवरून एकेक शाळिग्राम खाली ढकलून द्यायचा. गुंडगुळा शाळिग्राम उतारावरून घरंगळत घरंगळत धप्पदिशी जमिनीवर येऊन आदळतो. बस्. एक-दोन-तीन-चार-पुष्कळ ! ते घरंगळणे, धप्पदिशी पडणे हे पाहण्यातच सारसाची मजा नि आनंद! सारस हाच एक आनंदी पक्षी आहे !

# मुनिआ

बहुरूपी जसा अनेक वेषांत भेटतो, तसाच मुनिआ पक्षीसुद्धा तऱ्हेत-ऱ्हेच्या रंगारूपात दिसतो. फरक मात्र असा की, एकच बहुरूपी अनेक वेष घेत असतो; म्हणून तर 'बहुरूपी' म्हणायचं. तर मुनिआ वेगवेगळ्या रंगारूपाचेच असतात मुळात. एखाद्या फन्-फेअरमध्ये विविध वेशभूषांची स्पर्धा असते, तशापैकीच हे विविध-रंगी पक्षी.

रंगारूपावरून वेगवेगळ्या ठिकाणचे मुनिआ ओळखता येतात. पक्ष्यांना आणि पशूंना ईश्वरानं सभोवतालच्या वनश्रीनुसार, निसर्गानुसार रंग दिलेले आहेत. या रंगांचा उपयोग सौंदर्य म्हणून होतोच, पण संरक्षणाचे साधन म्हणूनही होत असतो. त्या त्या रंगाच्या वृक्षराजीत, मातीवर, खडकावर, त्याच रंगाचा पक्षी बसला तर दुसऱ्या शिकारी पक्ष्याला सहजरीतीनं ओळखता नाही येत. इतका त्याचा रंग आसपासच्या निसर्गाशी मिळता जुळता असतो.

मुनिआ पक्षी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या रंगारूपाचा आढळतो. त्याला हेही कारण असावे. रूप जरी भिन्न भिन्न दिसले तरी सगळ्याच ठिकाणच्या मुनिआ पक्ष्यांचा आकार मात्र एक-सारखा असतो. वर्णसाम्य नाही, पण आकारसाम्य त्यांच्यात आहे. सगळेच मुनिआ जवळ जवळ चिमणीच्या आकाराचे, मुठीएवढे असतात.



लाल मुनिआ हा लालसर वर्णाचा असतो. इंग्रजीत याला 'रेड मुनिआ' अथवा 'वॅक्सविल' म्हणतात तर हिंदीत याला 'लाल', 'लाल मुनिआ' अथवा 'लाला मुनिआ' असेही म्हणतात. नर-मादी एरवी एकसारखेंच दिसतात. याच्या तपकिरी पाठीवर पांढरे बारीक बारीक ठिपके असतात. चोच लाल असते, आणि तपकिरी रंगाचे, टोकाला गोलसर असे त्याचे शेपूट असते. लाल मुनिआ हा पक्षी तसा चारचौघांतला आहे. एकटा राहणारा किंवा तिरसटासारखा वागणारा नाही. म्हणून त्यांचे छोटे छोटे कळप अथवा थवे असतात. कळपात वाढणारा हा पक्षी आहे. नदी, तळे, सरोवर अशा पाण्याच्या जवळच्या भागात लाल मुनिआंचे कळप आढळतात. पाण्याच्या आसपासच्या भागात जमीन ओलसर असते. त्या जमिनीत हिरवेगार, उंच गवत वाढलेले असते ; कळ-

काची वने माजलेली असतात. लाल मुनिआला असे ठिकाण आवडते. गवताळ भागात गवताचे बी आणि बारीक सारीक कीडमुंगी हे खाद्य त्याला सहज मिळते. हेच त्याचे प्रमुख अन्न. मुनिआची जोडी नाजुक, पण मधुर आवाजात चिवचिवत असते, विणीच्या काळात तर मुनिआ फक्त ' ट्विट्-ट्विट्-ट्विट्-ट्विट् ' असा मंद आवाज करत असतो. त्याचं हे ' ट्विट् ' गाणं हळू, पण अखंड चाललेलं असतं.

मुनिआबाई सामान्यत: जून ते ऑक्टोबर या पावसाच्या काळातच अंडी घालत असतात. त्या दर वर्षी चार ते सात अंडी घालतात. अंड्यांचा रंग शुभ्र पांढरा असतो. अंडी उबवणं, राखणं, पिलांची देखभाल करणं हे काम नर आणि मादी दोघं मिळून करतात. त्यांच्यात या बाबतीत सहकार दिसून येतो.

अंडी घालण्यापूर्वी नर-मादी दोघंही एक एक गवताची काडी जमवतात आणि एखाद्या झुडपात, जमिनीत आपलं घरटं खोलवर बांधून काढतात. घरट्याचा आकार गोलाकार असतो. त्याला एका बाजूने जाण्यायेण्यासाठी वाट ठेवलेली असते. गवताच्या काड्या किंवा पिसं यांचं अस्तर आतून घरट्याला लावलेलं असतं. त्यामुळं घरटं आतून गुबगुबीत, मऊ आणि ऊबदार राहतं.

मुनिआ हा पाळीव पक्षी आहे. पोपटासारखं पिंजऱ्यात ठेवून लोक त्याला सांभाळतात. त्याला तशी मागणीही असते. पक्षीबाजारात म्हणूनच मुनिआदेखील आढळतो. भारताच्या बहुतेक सर्व भागांत मुनिआ आढळतो. हिमालयातही २००० फुटांवर याची वस्ती आहे. उत्तरेत हिमालयात आढळतो तसा

दक्षिणेत कन्याकुमारीतही भेटतो. द्वीपकल्पामधील टेकड्यांवर ६००० फुटांवर हा पक्षी आढळतो. भारतावाहेर श्रीलंका सोडून ब्रह्मदेश आणि पाकिस्तान या देशांतही मुनिआची वस्ती आहे.

राजस्थान आणि पंजाब या राज्यांतील रखरखीत, रूक्ष प्रदेश सोडला तर लाल मुनिआप्रमाणे ठिपक्यांचा मुनिआही भारतात सगळीकडे भेटतो. हिमालयात हा सहा हजार फूट उंचीपर्यंत आढळतो. श्रीलंकेमध्ये याची वस्ती आहे, परंतु पश्चिम पाकिस्तानात हा राहात नाही. पूर्व पाकिस्तानात आणि ब्रह्मदेशातही ठिपक्यांचा मुनिआ दिसतो. इंग्रजीत याला स्पॉटेड मुनिआ म्हणतात, तर हिंदीत याला तेलिया मुनिआ म्हणतात. याची शेपटी टोकदार असते.

ठिपक्यांचा मुनिआ असतो चिमणीच्या आकाराएवढाच. विणीच्या हंगामात याच्या पंखाचा रंग चॉकलेटसारखा तपकिरी दिसतो, तर खालचा भाग पांढरा आणि त्यावर काळे ठिपके असा असतो. विणीचा जेव्हा हंगाम नसतो त्या वेळी कोवळ्या अपक्व पंखांचा रंग फिकट किंवा दाट तपकिरी असतो. नर-मादी दोघांचा रंग सारखाच दिसतो. ठिपक्यांचे मुनिआसुद्धा एकटेदुकटे न राहता कळप करून राहतात. त्यांचा हा कळप बहुधा उघड्या शेतावर भटकताना दिसतो. ठिपक्यांच्या मुनिआंचा कळप काही पाच-पंचवीस पक्ष्यांचा नसतो; तर चांगला मोठा असतो. दोन-दोनशेवर मुनिआ पक्षी एकेका कळपात आढळतात। गवताच्या बीजाभोवती भिरभिरतात. बीज टिपून खातात. कधी कधी जमिनीतून वर आलेले पंखधारी कीटकही हे पक्षी खाऊन टाकतात. चाहूल लागताच झाडाझुडुपात उडून जातात. उडताना क्षीण चिवचिवाट करतात. तसेच गर्दी करून, घोळक्याने, लाटांप्रमाणे उडतात.

ठिपक्यांच्या मुनिआबाई जुलै ते ऑक्टोबर या पावसाळी दिवसांत ४ ते ८ पर्यंत अंडी घालतात. ही अंडी शुभ्र पांढऱ्या रंगाची असतात. अंड्यांसाठी काटेरी खुज्या झुडुपात गवताच्या पात्यांची घरटी हे पक्षी बांधतात. एखाद्या झुडुपात अनेक मुनिआंची अनेक घरटी आढळतात. घरटी बांधणं, अंडी राखणं, ती उबवणं, पिलांचं पोषण करणं ही सर्व घरगुती कामं नर आणि मादी दोघं मिळून करतात. एकमेकांच्या सहाय्यानं, सहकार्यानं त्यांचा संसार चाललेला असतो.

लाल मुनिआ, ठिपक्यांचा मुनिआ या जशा दोन जाती तशाच आणखी तीन जातींचे मुनिआ पक्षी भेटतात.

पांढऱ्या पाठींचे मुनिआ, पांढऱ्या गळ्यांचे मुनिआ, आणि काळ्या डोक्यांचे मुनिआ.

आकारमानाने हे तिन्हीही मुनिआ लाल आणि ठिपक्यांच्या मुनिआंएवढेच असतात. पांढऱ्या पाठीच्या मुनिआची चोच निळसर, निमुळती असते. पंख पाचरीसारखे दिसतात. पांढऱ्या गळ्याचे जे मुनिआ असतात त्यांचा वरचा रंग मातकट तपकिरी असतो. चोच जाडसर दिसते, आणि काळ्या वर्णाचे टोकदार शेपूट याला असते. काळ्या डोक्याचे मुनिआ आखूड आणि कठीण अशा निमुळत्या चोचींचे असतात. डोक्याप्रमाणेच मान, छातीचा वरचा भाग, बूड, जांघा, आणि शेपटीच्या खालचा भाग काळा असतो. याची पाठ तपकिरी वर्णाची असते, तर पोट पांढऱ्या वर्णाचे दिसते. नर-मादी दिसायला एकसारखेच दिसतात.

पांढऱ्या पाठीच्या आणि गळ्याच्या मुनिआबाई वर्षातून ४ ते ६ पर्यंत केव्हाही पांढरी अंडी घालतात.तर काळ्या डोक्याच्या मुनिआबाईंना पावसाळ्याचे दिवसच यासाठी पसंत पडतात. सगळ्यांची घरटी गवताची आणि गोल असतात.

# दयाळ

एका जंगलात एक दयाळ पक्ष्याचे जोडपे राहात होते. नर आणि मादी. नर बुलबुल पक्ष्याच्या आकाराचा होता, तर मादी त्याच्यापेक्षा थोडीशी लहानसर होती. नर गवई होता. तो सुंदर गाणे म्हणायचा, तर मादी नीटनेटका संसार करायची. घरदार सांभाळायची. पिलांचे पालन पोषण करायची. ती हुषार गृहिणी होती.

तर उन्हाळचाचे दिवस आले. दयाळकाकूंना अंडी घालायची होती. त्या भिरभिर जंगलभर फिरल्या, एक उंच झाड शोधले. त्या उंच झाडावर, उंच भागावर एक झकास खोबण होती. बिळासारखी. दयाळकाकूंना ही जागा पसंत पडली. कशी सुरक्षित आडबाजूला, मनाजोगती होती.

पण दयाळकाकांच्या मनाने भलतेच वेड घेतलेले होते. एकदा कधी तरी त्यांनी कुणाकडून तरी असे ऐकलेले होते की, जंगलाच्या बाहेर थोडचा अंतरावर एक गाव आहे. या गावात एक श्रीमंत माणूस राहतो. या श्रीमंत माणसाचे एक टोलेजंग, सुरेख घर आहे. त्या घराभोवती प्रशस्त, सुंदर बाग आहे. बागेत नानातऱ्हेची झाडे आहेत, फुले आहेत, फळे आहेत, पाण्याचे हौद आहेत, कारंजी आहेत, मजाच मजा आहे!

आणि हे मजेशीर वर्णन ऐकून दयाळकाकांनी ठरवले होते की या जंगलात घर करण्यापेक्षा त्या श्रीमंत गृहस्थाच्या

बागेत एखाद्या झाडावर घर करून राहावे. त्यांनी आपल्या पत्नीला आपला हा विचार सांगितला. पण ती म्हणाली,'कशाला ती बाग आणि कशाला ती श्रीमंती? आपले हे जंगल काय वाईट आहे? माझे अंडी घालण्याचे दिवस जवळ येत चाललेत. निवाऱ्याचं घर हवं म्हणून मी एका झाडावर छानशी जागा देखील पाहून ठेवलीय. इथंच राहा. पिलांसाठी गा.'

पण दयाळकाकाना काही हे पटले नाही. एके दिवशी ते एकटेच उठले आणि पंख पसरून गावाकडे निघाले. जाता जाता त्यांना एक कोंबडा भेटला. म्हणाला, 'दयाळकाका, दयाळकाका कुठं निघालात ? '


'गावात एक श्रीमंत माणूस राहतो. त्याची एक सुरेख बाग आहे. त्या बागेत घर करणार. श्रीमंत माणसाला गाणं ऐकवणार!' दयाळकाका म्हणाले.

'अरे वा ! मग मी येऊ काका तुमच्याबरोबर ? मला काही गाता येत नाही, पण आरवता मात्र येते.'

'हरकत नाही. चल माझ्याबरोबर. गाता येत नाही तर गप्प राहा. आरवू मात्र नकोस.' कोंबडयाला घेऊन दयाळकाका पुढे निघाले. जाता जाता त्यांना भेटला एक कुत्रा. भला दांडगा, मस्त. म्हणाला, 'दयाळकाका, कुठं निघालात ?'

'गावात एक श्रीमंत माणूस राहातो. त्याची एक सुरेख बाग आहे, त्या बागेत घर करणार. श्रीमंत माणसाला गाणं ऐकवणार.'

'अरे वा! मग मी येऊ काका तुमच्याबरोबर? मला काही गाता येत नाही, पण भुकता मात्र येते.'



'हरकत नाही, चल माझ्या बरोबर. गाता येत नाही तर गप्प राहा, पण भुकू नकोस !'

दयाळकाकांनी कुत्र्यालाही बरोबर घेतले.

जाता जाता त्यांना एक बोका आणि बैलही भेटला. त्या दोघांनाही दयाळकाकांनी बरोबर घेतले. बोक्याला सांगितले, 'गाता येत नाही तर गप्प राहा, पण गुरकावू नकोस.'

बैलालाही बजावले, 'गाता येत नाही तर गप्प राहा, पण हंबरू नकोस.'

शेवटी ती सगळी जणं त्या छानदार बागेजवळ आली. दयाळकाका म्हणाले, 'वा ! खरोखरच सुंदर बाग आहे !'

कोंबडा म्हणाला, 'सुंदर आहे खरी, पण तुम्हाला घर करता येईल असे उंच, मोठे एक तरी झाड आहे का इथे ?'

'हं ! नाही खरं. मग मी एखाद्या भितीचं बीळ निवडीन घरासाठी. हृचा काय घराच्या भिंती दिसताहेत. ती खिडकी पण उघडीच दिसतेय. ए, तुम्ही थांबा इथंच. मी खिडकीतून डोकावून पाहतो.'

दयाळकाका भुर्रकन उडाले. खिडकीच्या दारावर जाऊन बसले. आत श्रीमंत माणूस आणि त्याची बायको, मुलं, सगळी जणं खातपीत, गप्पा मारत बसली होती. दयाळकाकांनी 'स्वीई, स्वीई, स्वीई' असे मंजूळ गाणे म्हटले. त्याबरोबर आतल्या सगळ्यांचे लक्ष खिडकीकडे वेधले.

'किती गोड गाणे गातोय हा पक्षी !' श्रीमंत माणूस म्हणाला.

'छान आहे. पिंजऱ्यात पकडून ठेवू या आपण. म्हणजे रोज गाणे ऐकायला मिळेल.' श्रीमंत माणसाची बायको म्हणाली.

'पकड रे त्या पक्ष्याला.' श्रीमंत माणसाने चाकराला हुकूम सोडला. चाकराने पटकन कपडा टाकून शिताफीने दयाळकाकांना पकडले. 'च र्रं र्रं ऽऽ च र्रं र्रं ऽऽ' दयाळकाकांनी कर्कश आवाज काढला. चाकर तसाच त्यांना घेऊन घरात गेला. दयाळकाकांची फडफड आणि 'चर्रर्र ऽऽ चर्रर्र ऽऽ' ओरडणे सुरूच होते. चाकर पिंजरा आणायला गेला. तेवढ्यात दयाळकाकांच्या ओरडण्या-वरून ते कसल्यातरी संकटात सापडले आहेत हे ओळखून बाहे-

रच्या सोबत्यांनी एकच गोंगाट केला. तो ऐकून घरातली मंडळी बाहेर धावली. ती संधी साधून बोक्याने खिडकीतून उडी मारून कपडा दूर केला. दयाळकाका भुर्रकन बाहेर उडून आले. बोकाही टुणकन उडी मारून आला. सगळ्यांनीच मग काढता पाय घेतला. सगळे परत आपल्या जंगलात आले. दयाळकाकू काकांना म्हणाल्या, ' पिंजऱ्यापेक्षा आपले हे जंगलातले घर किती चांगले ! इथली झाडं किती चांगली. इथली फुलं किती चांगली. इथली फळं किती चांगली आणि इथले पशू-पक्षी सुद्धा किती चांगले आणि प्रेमळ ! '

दयाळकाकांना अनुभवांनी हे पटले होते. त्यांनी डोक्यातले वेड काढून टाकले आणि दयाळकाकूंनी पाहिलेल्या घरात तेही राहू लागले. पूर्वीप्रमाणेच मोकळ्या, गोड गळ्याने गाऊ लागले, ' स्वीई, स्वीई, स्वीई, स्वीई ऽऽऽ ..' दयाळ पक्ष्याची ही गोष्ट कधी तरी वाचल्याचे आठवते आहे. दयाळ पक्षी मात्र नित्य पाहण्यातला आहे. ओळखीचा आहे. चिमणीपेक्षा थोड्या मोठ्या आकाराचा दयाळ काळ्या-पांढऱ्या रंगाचा असतो. दह्यात लोळल्यासारखा दिसतो. म्हणून खेडूत लोक याला धह्याळ किंवा दह्याळ म्हणतात. आणि या दह्याळचाच दयाळ झाला असावा ! हिंदीत या पक्षाला दैयार किंवा दैया असे म्हणतात. दयाळ हा गाणाऱ्या पक्ष्यांपैकी एक आहे. मात्र हा बेताचाच गवई आहे. शाम पक्ष्यांसारखा पटाईत किंवा प्रसिद्ध गवई नाही. ग्रीष्म ऋतू जवळ आला म्हणजे याला गाण्याची विशेष लहर येते. याचा आवाज खुलतो आणि झाडाच्या उंच शेंड्यावर बसून हा गाऊ लागतो. याचे गाणे ऐकायला मंजूळ वाटते. यात शंकाच नाही. गाताना

खाली दबलेले आणि थोडे पसरलेले शेपूट तो सारखा वर खाली हलवत राहतो. एखादा गवई जसा पायाने अथवा हाताने ताल धरतो, त्याप्रमाणे शेपटीची ही हालचाल तो करतो. याची सुरावट भरगच्च असते. आवाजही मोठा असतो.

कंठ फुटल्यावर दयाळ पक्षी शांत क्वचितच बसतो. या झाडावरून त्या झाडावर भिरभिरतानाही याच्या ताना सुरूच राहतात. अखंड गाणे चाललेले असते.

हा जसा गवई आहे तसाच नकल्याही आहे ! खाटिक पक्षी जसा अन्य पक्ष्यांच्या आवाजांच्या नकला करतो, तसाच दयाळही करत असतो. या नक्कलखोरपणामुळे त्यास भक्ष्य मिळू शकते. कीड-मुंगी हे दयाळचे मुख्य खाणे. जंगलात पाचोळ्याखाली हे भरपूर मिळते. कीडमुंगी मटकावणारा दयाळ विचाऱ्या कीटकांना मात्र दुष्ट, क्रूर वाटत असेल ! ज्याच्या हृदयात दया नाही तो दयाळ कसला ? असेही ते म्हणत असतील !

दयाळ कीटकभक्षी असला तरी झाडांवरची फळे खाण्यात आणि फुलांमधील मध चाखण्यातही तो मागे नसतो. पांगारा किंवा काटेसावरीच्या फांद्या जेव्हा फुलांनी लहडून येतात तेव्हा दयाळाची स्वारी या फुलांभोवती भिरभिरताना हमखास दिसते. फुलांमधील मध लुटणारे जे काही पक्षी आहेत त्यात दयाळ हाही एक आहे.

दयाळाची जोडी तशी माणूसघाणी नाही. गावाजवळ किंवा विरळ जंगलात ती राहते. विणीच्या हंगामाच्या वेळी नर-मादी जोडीनेच बहुधा दिसतात, पण हा हंगाम नसतो त्यावेळी तो नर मात्र एकटाच भटकत राहतो. या वेळी



BVBK-0401307

असतो. झुडुपाझुडुपांमधून जाताना 'स्वीई' असा आवाज काढतो.

कंठ फुटल्यावर उन्हात पंख फडफडावत जाताना हा विशेष देखणा आणि आकर्षक दिसतो.

आपल्या टापूत आपले राज्य स्थापन करणाऱ्या पक्ष्यांपैकी दयाळही आहे. या राज्याचे रक्षण करताना दयाळ भलताच भांडखोर बनतो. विणीच्या हंगामातही त्याचा हा भांडखोरपणा वाढलेला असतो. या वेळी मादीला आकर्षित करून घेण्यासाठी नरांमध्ये जणू स्पर्धाच चाललेली असते. आपण तिच्या डोळ्यांत भरावे म्हणून याच्या किती लटपटी! दयाळ या वेळी शेपटी पाठीवर उंच काय धरतो, ती– पंख्यासारखी काय पसरतो, छाती काय फुगवतो, चोच आभाळाकडे करून मादीपुढे नाचतो काय, डोलतो काय, सारा दिमाख वेगळाच!

दयाळकाकू एप्रिल ते जून या दिवसात घरट्यात तीन ते पाच अंडी घालतात. अंडी लहान असतात आणि निळसर हिरवट छटा त्यावर असते. तांबूस-तपकिरी ठिपके किंवा चट्टेही अंड्यांवर दिसतात. मादी अंडी उबवण्याचे काम करते तर नर तिला इतर कामात मदत करत असतो. पिलांचे पालनपोषण दोघे मिळून करतात. कीडमुंगी आणून भरवतात.

अंडी घालण्याच्या आधीच दोघे मिळून घर सजवतात. झाडाच्या खोबणीत, भिंतीच्या बिळात किंवा लाकडाच्या एखाद्या भोकातही दयाळ आपले घर करतात. गवताच्या काड्या, केस, कापूस जमवून घरात अंथरतात. गुबगुबीत, ऊबदार घर बनवतात. अंड्यांना आणि नंतर पिलांना हे घर सुरक्षित, सुखद होते.

दयाळ हा पक्षी तसा सर्व भारतभर आढळतो. पाकिस्तान श्रीलंका आणि ब्रह्मदेशातही दिसतो. सर्वत्र भेटणारा दयाळ राज

स्थानसारख्या रुक्ष, कोरड्या, वाळवंटी प्रदेशात मात्र आढळत नाही. कारण त्याला तिथले कोरडे हवामान आणि उघडा निसर्ग मानवतच नाही. आकारमान आणि वर्णभेद यांवरून पक्ष्यांतही चार जाती आढळतात. आपल्याकडे आढळणाऱ्या दयाळ जोड-प्यातही थोडा फरक आढळतोच. नर दयाळाच्या अंगावर काळा-पांढरा रंग असतो. पण मादीच्या अंगावर राखी पांढरा रंग दिसतो

रंग, आकार आणि आवाज यांवरून दयाळ हा आवडता, प्रिय व्हावा असाच पक्षी आहे.

म. ग्रं. सं. ... शाखा.
९३०७ दि. ५/१/८२